रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १६६
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मुलाच्या मृत्यूप्रकरणी दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर गुन्हा/२
नववर्षाचे स्वागत अनेकांनी केले देवदर्शनाने/५
एमटीपीएलमध्ये वाघोबा संघ विजेता/८

## देशातील पहिली बुलेट ट्रेन पुढील वर्षी धावणार



**नवी दिल्ली :** भारताचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा १५ ऑगस्ट २०२७ रोजी प्रवाशांच्या सेवेत दाखल होईल, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. ते गुरुवारी (दि.१) नवी दिल्ली येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा गुजरातमधील सुरत ते बिलिमोरादरम्यान असेल. यानंतर वापी ते सुरत, मग वापी ते अहमदाबाद आणि सर्वात शेवटी मुंबई ते अहमदाबाद असा पूर्ण मार्ग कार्यान्वित केला जाईल. दरम्यान, देशातील पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन लवकरच सुरू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या काही दिवसांमध्ये या गाडीला हिरवा झेंडा दाखवतील. स्वदेशी बनावटीची ही पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन गुवाहाटी आणि कोलकातादरम्यान धावेल, असेही त्यांनी सांगितले.

# भाजपचा विजयरथ सुऽऽसाट!

## राज्यात १२ उमेदवार नगरसेवकपदी बिनविरोध

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात होत असलेल्या महापालिकेच्या निवडणुकीत भाजपची विजयी घोडदौड सुरूच आहे. भाजपच्या आणखी सहा उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याने मतदानापूर्वीच १२ जागांवर ‘कमळ’ फुलले आहे. कल्याण-डोंबिवली, धुळे, पनवेल, भिवंडी, जळगाव आणि पिंपरी चिंचवड या महापालिकांमध्ये भाजपचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.

भाजपने कल्याण-डोंबिवली महापालिकेत विजयाचा गुलाल उधळल्यानंतर आता आणखी दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यासह भाजपच्या येथील विजयी उमेदवारांची संख्या आता पाच झाली आहे. रेखा चौधरी, आसावरी नवरे आणि रंजना पेणकर यांच्या विजयावर अर्ज छाननी झाली, त्याच दिवशी शिक्कामोर्तब झाले होते. अर्ज मागे घेण्यास गुरुवार (दि.१)पासून सुरुवात झाली. त्यानंतर भाजपच्या आणखी दोन उमेदवार बिनविरोध विजयी झाल्या आहेत. यामध्ये मंदा सुभाष पाटील आणि ज्योती पवन पाटील यांचा समावेश आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेत भाजपचे पाच उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रणनीती यशस्वी ठरल्याचे दिसून येते, तर शिवसेना शिंदे गटाचेही चार उमेदवार मतदानाआधीच जिंकले. त्यामुळे १२२ सदस्यसंख्या असलेल्या केडीएमसीत मतदानापूर्वीच महायुतीने सत्तेच्या दिशेने वाटचाल करण्यास सुरुवात केली आहे.

धुळे महापालिकेमध्ये भाजपचे तीन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. अर्ज माघारी घेण्याच्या पहिल्याच दिवशी सुरेखा उगले या विजयी झाल्या. याआधी छाननीवेळी उज्ज्वला भोसले आणि ज्योत्स्ना पाटील या भाजपच्या दोघी प्रतिस्पर्धी उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने



बिनविरोध निवडल्या गेल्या होत्या.

भिवंडी महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने विजयाचे खाते उघडले आहे. प्रभाग समिती क्रमांक १७ ब मधील भाजप उमेदवार तथा माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे बिनविरोध निवडून आले आहेत. विशेष म्हणजे २४ वर्षांमध्ये झालेल्या भिवंडीतील चार निवडणुकांमध्ये कोणीही बिनविरोध विजयी झाला नव्हता, तो विक्रम भाजपचे सुमित पाटील यांनी पाचव्या सार्वत्रिक निवडणुकीत केला आहे.

जळगाव महापालिकेत भाजपच्या माजी शहरप्रमुख व उमेदवार उज्ज्वला बेंडाळे प्रभाग क्रमांक १२ ब मधून बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यांच्या विरोधातील दोन्ही अर्ज छाननीत बाद झाल्याने बेंडाळे यांची बिनविरोध निवड झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

पनवेलमध्ये भाजपने अर्ज छाननीच्या दिवशीच एका जागेवर विजय मिळवला. प्रभाग क्रमांक १८मधून नितीन पाटील हे बिनविरोध विजयी झाले आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार रोहन गावंड (शेकाप) यांचा अर्ज छाननीत बाद झाला.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार रवी लांडगे प्रभाग क्रमांक ६मधून बिनविरोध निवडून आले आहेत. त्यांच्या विरोधात असलेले उमेदवार प्रसाद ताठे यांनी उमेदवारीतून माघार घेतली. त्यामुळे लांडगे यांची सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे.

अशा प्रकारे भाजपने कल्याण-डोंबिवलीत पाच, धुळे तीन, तर पनवेल, भिवंडी, जळगाव आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत प्रत्येकी एक अशा एकूण १२ जागांवर बिनविरोध विजय मिळवला आहे. याशिवाय शिवसेना शिंदे गटाने केडीएमसीत चार आणि जळगावात तीन जागा बिनविरोध जिंकल्या तसेच अहिल्यानगरमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या दोन जागा बिनविरोध निवडून आल्या. त्यामुळे राज्यात महायुतीच्या एकूण २१ जागा बिनविरोध झाल्या आहेत.

## पनवेल मनपा निवडणुकीत ३४३ उमेदवारी अर्ज वैध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. २० प्रभागांतील एकूण ३४३ अर्ज वैध, तर ५७ अवैध ठरले आहेत.

येथील महापालिकेच्या एकूण ७८ जागांसाठी एकूण ४०० नामनिर्देशनपत्रे दाखल झाली होती. अर्ज छाननीचे काम बुधवारी उशिरा रात्रीपर्यंत सुरू असल्याने गुरुवारी सकाळी निवडणूक विभागाने वैध उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर केली.

प्रभाग क्रमांक १८ अ मधून केवळ एकच उमेदवारी अर्ज वैध ठरल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे भाजपचे उमेदवार नितीन जयराम पाटील बिनविरोध निवडून आले असून महाविकास आघाडीला झटका बसला आहे.

**लढतींचे चित्र आज होणार स्पष्ट**

अनेक प्रभागांमध्ये दुरंगी-तिरंगी लढतींचे संकेत मिळत असून काही ठिकाणी बहुरंगी लढती होऊ शकतात. २ जानेवारी ही माघार घेण्याची मुदत असल्याने त्यानंतरच राजकीय सामन्यांचे चित्र स्पष्ट होणार आहे. काही तिरंगी लढतींमध्ये डमी उमेदवार किंवा अपक्ष उमेदवार माघार घेतील, अशी शक्यता आहे.





**मुंबई : पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक १८मधून बिनविरोध निवडून आल्यानंतर भाजपचे उमेदवार नितीन पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यांच्यासमवेत पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तसेच प्रीतम म्हात्रे, रूपेश नागवेकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : येथील महापालिका निवडणुकीच्या मतदानापूर्वीच भाजप महायुतीने विजयाचे खाते उघडले असून प्रभाग क्रमांक १८मधून भाजपचे उमेदवार नितीन पाटील हे नगरसेवकपदी बिनविरोध निवडून आले आहेत. पाटील यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सोबत पदाधिकारी व कार्यकर्ते.**

## निवडक

### बांगलादेशमध्ये आणखी एका हिंदू व्यक्तीच्या हत्येचा प्रयत्न

**ढाका :** मागील काही काळापासून बांगलादेशमध्ये गोंधळ सुरू आहे. काही दिवसांपूर्वी दोन हिंदू तरुणांची जमावाने हत्या केल्याचे समोर आले होते. आता पुन्हा एका हिंदू व्यक्तीच्या हत्येचा प्रयत्न झाला. शरीयतपूर परिसरात खोकन चंद्रा (वय ४०) नावाच्या व्यक्तीला जमावाने घेरले. त्याला आधी क्रूरपणे मारहाण करण्यात आली, नंतर चाकूने मारले आणि पेट्रोल टाकून जिवंत जाळण्यात आले. चंद्रा यांनी जवळच्या तलावात उडी मारल्याने त्यांचा जीव वाचला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### अवकाशात उद्या ‘सुपर वूल्फ मून’ची खगोलप्रेमींना पर्वणी

**नवी दिल्ली :** नववर्ष २०२६ची एका विलोभनीय खगोलीय घटनेने होणार आहे. ३ जानेवारी रोजी वर्षातील पहिले चंद्रदर्शन घडणार आहे. या दिवशी वर्षातील पहिला सुपरमून असेल. तो इतर पौर्णिमेपेक्षा खूप मोठा असेल. याला वूल्फ मून असेही म्हणतात. आकाश स्वच्छ असल्यास संपूर्ण देशभरात हे विहंगम दृश्य दिसेल.

## नक्षलपीडित कुटुंबांना दिलासा

### २९ तरुणांना मिळाली शासकीय नोकरी

**गडचिरोली : प्रतिनिधी**

नक्षलवादामुळे यातना भोगाव्या लागलेल्या कुटुंबांचे पुनर्वसन आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी जिल्हा प्रशासनाने नववर्षाच्या सुरुवातीलाच एक महत्त्वपूर्ण निर्णयाची अंमलबजावणी केली आहे. जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांच्या पुढाकारातून नक्षलपीडित कुटुंबातील २९ तरुणांना शासनसेवेत सामावून घेत त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत शिपाई पदावर नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीपत्रांचे गुरुवारी (दि. १) वितरण करण्यात आले.

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी आजवर पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयातून शेकडो निरपराध नागरिकांची हत्या केली आहे. या पीडित कुटुंबांतील एका सदस्यास शासन सेवेत सामावून घेण्यासाठी शासन निर्णयान्वये तरतूद करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांनी वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत पूर्वी निरसित करण्यात आलेली २९ शिपाई संवर्गाची पदे पुनर्जीवित करून घेतली.

या प्रयत्नांचे फलित म्हणून गुरुवारी नक्षलपीडित कुटुंबातील २९ उमेदवारांना जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत शिपाई पदावर रुजू होण्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते या नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

शासनसेवेत प्रवेश मिळालेली ही संधी केवळ रोजगारापुरती मर्यादित नसून समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून काम करण्याची संधी आहे. सेवेत कार्यरत असताना नियमांचे काटेकोर पालन, जनतेप्रती संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता या मूल्यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे जिल्हाधिकारी या वेळी म्हणाले तसेच सेवेत रुजू होताना आवश्यक असलेले प्रशिक्षण प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन देत त्यांनी नवनियुक्त सर्व २९ कर्मचाऱ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## तळीरामांवर कारवाई

**ठाणे : प्रतिनिधी**

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई, ठाणे, यांसारख्या शहरांमध्ये पोलिसांनी तळीरामांवर (मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर) मोठी कारवाई केली असून हजारोंवर ’ड्रंक अँड ड्राईव्ह’ अंतर्गत गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवरही कारवाई सुरू आहे.

थर्टीफस्टच्या मध्यरात्री नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडली नाही. त्यामुळे पोलिसांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे, मात्र पोलिसांकडून थर्टीफस्टच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या ड्रंक ॲण्ड ड्राईव्हच्या मोहिमेत मद्यप्राशन करून वाहन चालविणारे २५० तळीराम पोलिसांच्या हाती लागले. या सर्वांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली. त्याशिवाय पोलिसांनी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३५५० वाहनचालकांवरही कारवाई कारवाई केली. मद्यपी चालकांसोबत प्रवास करणाऱ्यांवरही नियमानुसार कारवाई करण्यात आली. या कारवाईनंतर आता तळीरामांना न्यायालयाच्या दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. पोलिसांकडून जनजागृती केल्यामुळे या वर्षी तळीरामांची संख्या कमी झाल्याचे चित्र आहे.

## नववर्षाच्या जल्लोषाला गालबोट

**बर्न : वृत्तसंस्था**

स्वित्झर्लंडमध्ये गुरुवारी (दि.१) नवीन वर्षाच्या जल्लोषावेळी एक मोठी दुर्घटना घडली आहे. स्की रिसॉर्टमध्ये झालेल्या स्फोटात ४० जणांचा मृत्यू, तर १००हून अधिकजण जखमी झाले.

याबाबत दक्षिण-पश्चिम स्वित्झर्लंडच्या वालिस कॅंटनमधील एका पोलीस प्रवक्ते गॅटन लॅथियम यांनी एएफयी यांनी माहिती देताना सांगितले की, अल्पाइन स्की रिसॉर्ट बारमध्ये हा स्फोट झाला. याचे कारण अद्याप समोर आले नाहीये. यात अनेक लोक मृत्युमुखी पडलेत. पर्यटकांमध्ये लोकप्रिय असलेल्या ले कॉन्स्टेलेशन नावाच्या बारमध्ये पहाटे १.३०च्या सुमारास स्फोट झाला. येथे अनेकजण नवीन वर्षाचा दिवस साजरा करण्यासाठी आले होते.

स्विस माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या फोटोंमध्ये एका इमारतीला आग लागल्याचे दिसते तसेच जवळच अनेक आपत्कालीन वाहने असतात. दरम्यान. बारमध्ये स्फोट झाल्यानंतर बचाव कार्य सुरू करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. स्काय न्यूजने पोलिसांच्या हवाल्याने सांगितले



**स्वित्झर्लंडमध्ये भीषण स्फोटात ४० जण ठार, अनेक जखमी**

की, या घटनेत किमान १० जणांचा मृत्यू झालाय, तर काही स्थानिक माध्यमांचे म्हणणे आहे की, हा आकडा खूप जास्त असू शकतो, परंतु पोलीस प्रवक्याने मृतांच्या संख्येची पुष्टी करण्यास नकार दिला. अनेक जण भाजलेल्या जखमांवर उपचार घेत असल्याचे वृत्त आहे.

स्विस पोलिसांनी सांगितले की, प्राथमिक तपासानुसार बारमध्ये स्फोट झाल्यानंतर आग लागली होती. सध्या तरी कोणताही दहशतवादी कट असल्याचे दिसत नाही. अधिक तपास सुरू आहे.





**मुरूड : येथील पर्यटन महोत्सवात फायर शो आयोजित करून सरत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. ही नयनरम्य आतषबाजी अनेकांनी आपल्या मोबाईलमध्ये टिपली.** (छाया : सुधीर नाझरे)

## रायगडात सुक्या मासळीची आवक वाढली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा ताज्या म्हावऱ्यासाठी प्रसिद्ध आहे तसेच सुक्या मासळीची मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. येथील ओल्या मासळीबरोबरच सुकविलेल्या मासळीलाही मोठी बाजारपेठ आहे. सध्या जिल्ह्यात सुक्या मासळीची आवक वाढली आहे.

समुद्रात मिळालेली ताजी मच्छी सगळीच विकली जात नाही. सध्या ओली मासळी मुबलक मिळत असल्याने मोठ्या प्रमाणावर मासळी सुकवली जात आहे. अलिबाग, मुरूड, उरण, श्रीवर्धन, नवगाव, वरसोली या ठिकाणी सकाळी मासळी सुकविण्यासाठी, तर सायंकाळी जमा करण्यासाठी कोळी महिलांची लगबग दिसून येते. सुक्या मासळीच्या व्यवसायावर जिल्ह्यातील हजारो कुटुंबांचा चरितार्थ चालतो.

जिल्ह्यात चार हजार ९९३ छोट्या-मोठ्या नौकांच्या माध्यमातून मासेमारी करण्यात येते. बाजारात ताजे मासे



मुबलक आल्याने विकून शिल्लक राहिलेले सुकवले जातात. बोंबील, आंबाड, जवळा, कोळंबी, मांदेली, बांगडा, माकूल, मांदेली, बगा, वाकटी, ढोमा आदी छोट्या माशांबरोबरच मोठे मासेही सुकवले जातात.

अलिबाग तालुक्यातील अलिबाग कोळीवाडा, वरसोली समुद्रकिनारा, नवगाव, बोडणी, रेवस, आग्राव कोळीवाडा; मुरूड तालुक्यातील मुरूड कोळीवाडा, एकदरा, कोर्लई, बोर्ली; उरण तालुक्यातील करंजा, मोरा, बेलपाडा; श्रीवर्धनमध्ये दिवेआगर, श्रीवर्धन कोळीवाडा येथे मोठ्या प्रमाणात मासळी सुकविण्यात येते. सध्या जिल्ह्यात सुक्या मासळीची आवक वाढली आहे. त्यामुळे ही मासळी स्वस्त आहे. जवळा ३०० रुपये, आंबाड ६०० रुपये, वाकटी ३५० रुपये, बोंबील ६०० रुपये किलो, सोडे १८०० रुपये किलो विकली जात आहे.

> **मासेमारीला ऑगस्ट महिन्यात सुरुवात होते. याच महिन्यात मासे जास्त मिळतात, परंतु पाऊस असल्याने ऑक्टोबर महिन्यापर्यंत मासे सुकवता येत नाहीत. परिणामी नुकसान होते. पावसाळ्यातही मासे सुकवता येतील अशा सुविधा शासनाने उपलब्ध करून द्याव्यात.**
> **-डॉ. कैलाश चौलकर,**
> रायगड जिल्हाध्यक्ष, वेस्ट कोस्ट वेल्फेअर पर्सेसिंग असोसिएट

# बदलापूर-कर्जत रेल्वे प्रवास सुखकर होणार

## चौपदरीकरणाला मंजुरी, सहा स्थानकांचा समावेश

**नेरळ : प्रतिनिधी**

बदलापूर ते कर्जत आणि कर्जत ते बदलापूरदरम्यान रेल्वेने प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी दिलासादायक ठरणारी बातमी असून, या मार्गावर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गाच्या अर्थात चौपदरीकरण प्रकल्पाला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट-३बी (MUTP-३B) अंतर्गत राबवला जाणार असून, आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीने यापूर्वीच याला मान्यता दिली होती.



मंजूर झालेला बदलापूर-कर्जत चौपदरीकरण प्रकल्प सुमारे ३२.४६ किलोमीटर लांबीचा असून हा नवा रेल्वे मार्ग सध्याच्या रेल्वे मार्गालगत विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पात बदलापूर, वांगणी, शेलू, नेरळ, भिवपुरी रोड आणि कर्जत या सहा प्रमुख उपनगरीय स्थानकांचा समावेश आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे ३७.७९ हेक्टर खासगी जमीन आवश्यक असून त्यासोबतच शासकीय आणि रेल्वेची जमीनही वापरण्यात येणार आहे. चौपदरीकरणासाठी अंदाजे १,३२४ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, हा खर्च रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन संयुक्तपणे उचलणार आहेत.

तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेमुळे बदलापूर-कर्जत तसेच कल्याण-कर्जत विभागातील मुख्य आणि उपनगरीय रेल्वे वाहतूक स्वतंत्र होणार आहे. त्यामुळे लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांमधील अडथळे कमी होऊन रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तसेच उपनगरीय स्थानकांवरील गर्दीचा ताण कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बदलापूर कर्जत सध्या या मार्गावर दोनच रेल्वे मार्गिका असल्याने लांब पल्ल्याच्या गाड्या जात असताना लोकल गाड्यांना थांबावं लागते, ज्यामुळे प्रवाशांची खूप कोंडी होऊन वेळ वाया जातो.त्यामुळे लोकल गाड्यांची वाढती फेरीसुद्धा बंद होती. पण तिसरी आणि चौथी मार्गिका मंजूर झाल्याने, प्रवाशांना अधिक गाड्यांची सेवा मिळेल आणि वाहतूक सुलभ होणार आहे.

या चौपदरीकरण प्रकल्पामुळे देशातील अत्यंत वर्दळीच्या मुंबई-चेन्नई हाय डेन्सिटी रेल्वे कॉरिडॉरची क्षमता वाढणार असून, प्रवासी व मालवाहतुकीस गती मिळणार आहे. जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे काम सुरू होऊन पुढील ३ ते ४ वर्षांत प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता अधिकाऱ्यांकडून वर्तवण्यात आली आहे.एकूणच, बदलापूर-कर्जत चौपदरीकरणामुळे लोकल प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, वेगवान आणि सुखकर होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**कर्जत ते खोपोली दुहेरी रेल्वे मार्गिका केव्हा होणार?**

*कर्जत ते खोपोली हा रेल्वे मार्ग एकेरी असल्याने या मार्गावर रेल्वे प्रवाशांचे हाल होतात,एक तास येते प्रवाशांना ताटकळत ट्रेनची वाट पहावी लागते.समोरून जो पर्यंत ट्रेन खोपोली किंवा कर्जत स्थानकात पोहचत नाही तो पर्यंत दुसरी ट्रेन धावू शकत नाही.यामुळे ट्रेनची वाट पाहण्यासाठी प्रवाशना तासनतास वाट पहावी लागते.गेली कित्येक वर्षे दुहेरी रेल्वे मार्गिकेची मागणी होत आहे.परंतु याकडे कोणाचे लक्ष नाही असे खोपोलीकर सांगतात.लोक प्रतिनिधींचे याकडे दुर्लक्ष होते.त्यामुळे रेल्वे प्रशासनाने खोपोली करारांवर देखील थोडी दया दाखवावी, अशी मागणी होत आहे.*

## घूम येथील मुलाच्या मृत्यूप्रकरणी दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

म्हसळा तालुक्यातील घुमेश्वर (घुम, ता. म्हसळा) येथील १४ वर्षीय शाळकरी मुलगा गर्वांग दिनेश गायकर याच्या दुर्दैवी मृत्यू प्रकरणी तब्बल आठ महिन्यांनंतर न्यायाचा मार्ग मोकळा झाला आहे. उपचारात निष्काळजीपणा केल्याप्रकरणी उपजिल्हा रुग्णालय माणगाव आणि म्हसळा येथील दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अखेर म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

म्हसळा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या गर्वांग यास दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी ताप आल्याने त्याचे वडील दिनेश गायकर व चुलते सुरेश गायकर यांनी प्रथम ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर पुन्हा ताप वाढल्याने त्यास ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथून उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले.

मात्र, माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात संबंधित डॉक्टरांनी योग्य उपचार केले नाहीत ना रुग्णालयात दाखल करून घेतले. उपचाराअभावी कुटुंबीयांनी गर्वांग यास परत घुम येथे घेवून जाण्याची वेळ आली. मात्र ताप न उतरल्याने दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी पुन्हा ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे दाखल केले असता सकाळी ८.५४ वाजता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. या घटनेनंतर म्हसळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात आली होती.

सदर प्रकरणाचा सखोल तपास पोलीस उपनिरीक्षक एस.पी.रोहिणकर यांनी, स.पो.नि.रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली केला. तपासादरम्यान जिल्हा रुग्णालय अलिबाग रायगड येथील तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालात उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथील डॉ.अभिषेक रापते व डॉ.नितिश सावंत यांनी उपचारात गंभीर निष्काळजीपणा केल्याचे स्पष्ट झाले आहे.

या अहवालाच्या आधारे मयत मुलाचे वडील दिनेश सखाराम गायकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार म्हसळा पोलीस ठाण्यात ३० डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## वनराई बंधारे ठरताहेत शेतकरी आणि पशू-पक्ष्यांसाठी वरदान!

**खोपोली : प्रतिनिधी**

वनराई बंधारा बांधून पाण्याची पातळी वाढून काही दिवस पाणी येथेच अडविले, तर काही महिने या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागत असतात. ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते.गुरांच्या पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न मार्गी लागत असतो.यामुळे गाव पातळीवर बंधारा बांधून पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविणे काळाची गरज आहे.यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणी पशू पक्षी साठी वरदान ठरत आहे.



पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात, मात्र काही ठिकाणी हेच पाणी आपण अडवू शकतो. उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्व समजते कारण विहीर,तलाव,कूपनलिका,ओढे असे पाण्याचे असलेले स्त्रोत्र तळ गाठण्याची स्थिती निर्माण करीत असतात.पाणी हे आपले जिवन आहे.कारण जल है!तो हम है!अशा पध्दतीचे उच्चार सातत्याने करीत असतो.

यामुळे मात्र त्यांचे आचरणात कोणीही आणत नाही तुरळक ठिकाणी बंधारे बांधून पाणी अडविले जाते.मात्र प्रत्येकांनी आपले नैतिक कर्तव्ये म्हणून पाणी अडविले पाहिजे. पाण्याशिवाय कोणताही सजिव जिवंत राहू शकत नाही.

पशू,पक्षी,झाडे,मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्याप्रमाणावर होत असतो.यामुळे बंधारे यांचे महत्व जाणून घेवून पाणी अडविले पाहिजे.या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी तसेच जंगलातील प्राणी यांना पिण्यासाठी होत आहे.शिवाय शेतकरी वर्ग यावरती भाजी पाल्यांचे उत्पन्न घेउन आपली उपजीविका करीत असतो

## वीज कनेक्शन वेळेत मिळण्यासाठी महावितरणची नवी व्यवस्था

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसात आणि ग्रामीण भागात १५ दिवसात नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्जासोबत दाखलेही जोडता येतात.महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते.सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना हमखास आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत नवी जोडणी मिळण्याचा विश्वास महावितरणच्या प्रशासनाला वाटतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महानगरांसाठी तीन दिवस, शहरांसाठी सात दिवस आणि ग्रामीण भागात १५ दिवसात कनेक्शन देण्याची तरतूद केली असली तरी ती जेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, त्यासाठी ही कालमर्यादा आहे.

## कर्जत एसटी आगारात रस्ता सुरक्षा उपक्रमाचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना आयोजित केला जातो. कर्जत एस. टी. आगारात हा उपक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी कर्जत पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक लटपटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना वाहतूक सुरक्षेचे धडे दिले.



कर्जत एस टी आगारात राष्ट्रीय सुरक्षा उपक्रमाचे आयोजन केले होते. कर्जत पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीषा लटपटे यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विजय मांडे, आगार व्यवस्थापक दयानंद मोरे, लेखाकार अंकुश राठोड, सहाय्यक वाहतूक निरीक्षक महादेव पालवे, रवींद्र लोहकरे, भरत महाजन आदी उपस्थित होते. विलास बागुल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दीपक देशमुख यांनी प्रस्ताविकात आगाराची माहिती दिली.

लटपटे यांनी,एस टी किंवा कोणतेही वाहन चालवताना व्यसन करू नये कारण तुमच्या जीवावर प्रवासी प्रवास करीत असतात. जुने चालक जबाबदारीने एस टी चालवत असत. आता वाहनांची संख्या वाढत असल्याने एस टी चालवताना स्पर्धा करू नये. काही अपघात झाल्यास घाबरून न जाता ११२ क्रमांक डायल करून मदत घ्यावी म्हणजे पुढील अनर्थ टळतील.' असे सांगितले.

विजय मांडे यांनी, राष्ट्रीय सुरक्षा हा उपक्रम फक्त एक महिना न राबवता वर्षाचे ३६५ दिवस आपण व प्रवासी सुरक्षित राहतील असे एस टी वाहन चालवावे. विशेष म्हणजे जिल्ह्यात सर्वात कमी तोटा असलेले हे आगार आहे. याचे नूतनीकरण होणे गरजेचे आहे.' असे सूचित केले..

## कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या जिल्हा कारागृहातील बंद्यांना प्रमाणपत्र

### जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते वितरण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, त्यांचा व त्यांचे कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा, याउद्देशाने अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व विषेश कारागृह महानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग, जिल्हा उद्योग केंद्र, अलिबाग यांच्यामार्फत पुरुष बंद्यांना दुचाकी मोटार सायकल दुरुस्ती व महिला बंद्यांकरीता ब्युटिपार्लर बेसीक व ॲडव्हांन्स कोर्सचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.



यावेळी सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण,रायगड-अलिबाग श्रीम.तेजस्विनी निराळे, जिल्हा कौशल्य उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार, अधीक्षक,अलिबाग जिल्हा कारागृह विशाल बांदल यांच्यासह जिल्हा उद्योग केंद्रांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, कारागृह विभागाच्या सुधारणा व पुनर्वसन या ब्रिद वाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने किमान कौशल्य विकास डिपीसी-२०२५-२६ अंतर्गत अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी. बंद्यांचा, स्वतःचा व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा या उद्देशाने जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे.

ग्रामीण प्रगती फाऊंडेशन व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बंद्यांकरीता हेल्थ केअर सेक्टर अंतर्गत या कोर्ससाठी बंद्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणातून बंद्यानी चांगले प्रशिक्षण घेवून आपले जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करावा. तसेच प्रत्येक बंद्यांनी आपल्या आरोग्याच्या सोयी-सुविधांसाठी आयुष्यमान कार्ड काढून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. ज्या बंद्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही त्यांनी प्रशिक्षणासाठी आपला सहभाग नोंदवून प्रशिक्षण घ्यावे.

सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण श्रीम.तेजस्विनी निराळे यांनी सांगितले की, नियमित जीवन जगताना कायदा खूप महत्वाचा असतो. ज्या बंद्यांनी प्रशिक्षण पूर्ण करुन प्रमाणपत्र मिळविले आहे त्यांची प्रेरणा घेवून इतर जास्तीत जास्त बंद्यांनी घेवून हे प्रशिक्षण पूर्ण करावे. बंद्यांनी जागरुकतेने आपल्याला असलेल्या सोयी-सुविधा मिळविण्याचा प्रयत्न करावा. रोजगाराच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध असल्याने हे प्रशिक्षण बंद्यांनी घेतल्यास बंदी आत्मनिर्भर होवून त्यांना रोजगार उपलब्ध होईल.

## कर्जत संशोधन केंद्राकडून ट्रॉम्बे कोकण महान भात वाणाची निर्मिती



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत व भाभा अणू संशोधन केंद्र, ट्रॉम्बे,मुंबई यांनी विकसित केलेली ' ट्रॉम्बे कोकण महान ' ही भात जात राज्यस्तरीय वाण निवड समितीने प्रसारित करण्याची शिफारस केली आहे.

ट्रॉम्बे कोकण महान ही गरवी भात जात असून तिचा कालावधी १४० ते १४५ दिवसांचा आहे.दाण्याचा प्रकार लांबट बारीक असून उंची मध्यम म्हणजे १०५ ते ११० से. मी.आहे.उत्पादन क्षमता संकरित भातासारखी सरासरी ५० ते ५५ क्विंटल प्रती हेक्टर आहे.योग्य व्यवस्थापन केल्यास १०० क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन मिळू शकेल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे.पुसा बासमती आणि रत्नागिरी-२४ या दोन वाणांच्या संकरातून ही जात तयार केली आहे.

या वाणाच्या भरडाईचे प्रमाण ६९.५५ टक्के असून अखंड तांदळाचे प्रमाण ६१.२५ टक्के आहे.तांदूळ चकचकीत असून तांदळाची गुणवत्ता उत्तम आहे..तांदूळ शिजवल्यानंतर भात मोकळा होतो, चिकट होत नाही.

## रायगड जि.प. सीईओ नेहा भोसले यांची वडवळ येथे भेट; व्यवस्थेचा आढावा

**चौक :** रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी वडवळ ग्रामपंचायतीला पूर्वनियोजन भेट दिली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ह.भ.प.शिवलीला पाटील यांच्या कीर्तन कार्यक्रमाबाबत पूर्व नियोजनाबाबत आढावा घेण्यात आला.

या भेटीदरम्यान कार्यक्रमस्थळ, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, वीजपुरवठा, ध्वनि व्यवस्था, बसण्याची व्यवस्था, वाहतूक व सुरक्षितता याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा, तसेच ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणात सहभाग लाभावा, यासाठी आवश्यक सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या. शासनाच्या समृद्ध पंचायतराज अभियानाच्या उद्दिष्टांनुसार सामाजिक प्रबोधन, संस्कृती जतन व लोकसहभाग वाढविण्यासाठी अशा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाची उत्तम आखणी करावी, असे त्यांनी सांगितले.

## दुखवटा



### कमल म्हात्रे

**उरण :** कामगार नेते मयूर विठ्ठल म्हात्रे यांच्या मातोश्री तसेच दिवंगत कामगार नेते वि. दा. म्हात्रे धर्मपत्नी कमल विठ्ठल म्हात्रे यांचे २५ डिसेम्बर २५ रोजी दुखद निधनझाले . मृत्यू समयी त्यांचे वय ७८ वर्षे होते त्यांच्यापार्थिवावर उरण येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले ..त्यांचे दशक्रिया विधी शनिवार (दि. ३) जानेवारी २६रोजी श्रीक्षेत्र माणकेश्वर (केगाव )तालुका उरण येथे होणार आहे. उत्तरकार्य सोमवारी (दि. ५) रोजी राहत्याघरी मुळेखंड तालुका उरण येथे होणार आहे .त्यांच्या पश्यात एक मुलगा,दोन मुली,सुना ,नातवंडे,पतवंडे ,असा परिवार आहे .

# अवकाळी पावसामुळे पिके धोक्यात

## वर्षाच्या पहिल्याच दिवशी उरण, पनवेलमध्ये पाऊस

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सकाळी ६:४५ वाजताचे सुमारास अचानक अवकाळी पाऊस सुरू झाल्याने, बहरु लागलेले वाल, चवळी, हरभरा, मुगाची कडधान्य व भाजीपाला पिके त्याचबरोबर आंबा बागायती पिकेही धोक्यात आली आहेत. तालुक्यातील विटभट्टी व्यवसायावरही पावसाचा परिणाम झाला आहे.





थंडीच्या सुरुवातीला कडधान्य, भाजीपाला पिकांसाठी तसेच आंबा पिकासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्यामुळे, आंब्याला मोहर योग्य प्रकारे यायला लागला होता. कडधान्य पिकेही बहरू लागली होती. येथील फळबागा कैऱ्या धरण्याच्या स्थितीत असताना, अचानक वातावरणात बदल होऊन अवेळी पाऊस बरसल्यामुळे मोहोर काळवंडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कैऱ्याही गळून पडतील असा अंदाज येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

आंब्याप्रमाणेच कडधान्य व भाजीपाला पिकांवरही या अवेळी पावसाचा चांगलाच परिणाम होण्याची भीती बागायतदार व शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेवग्याच्या झाडांना यावर्षी चांगल्या प्रकारे मोहोर व शेंगाही आलेल्या असतांना ढगाळ वातावरणामुळे हा मोहोर गळू लागला आहे. वाल, चवळी, हरभरा, तुर, मुग, पावटा, घेवडा, वांगी, कलिंगड व अन्य पिकांवर या अवेळी पावसाचा परिणाम होण्याची शक्यता आहे, असे येथील बागायतदार शेतकरी दीपक पाटील, संदेश चिर्लेकर, भास्कर ठाकूर, प्रफुल्ल खारपाटील, दत्तात्रेय म्हात्रे, हिराजी ठाकूर, अस्मित ठाकूर, अविनाश पाटील, कृष्णा म्हात्रे, गोपीनाथ गोंधळी, संतोष गोंधळी, बळीराम म्हात्रे तसेच येथील अन्य शेतकऱ्यांनी सांगितले.

> **वाल, चवळी, घोसाळा व वांगी अशा प्रकारच्या पिकांची लागवड केलेली आहे, मात्र अवेळी पावसाचे पाणी शेतात साचल्यामुळे ही पिके वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच या अवकाळी पावसामुळे आंब्याचा मोहरही काळवंडून जाणार असल्याने येथील शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान होण्याच्या मार्गावर आहे.**
>
> **–दीपक पाटील, शेतकरी, चिरनेर**

# बांधकाम व्यावसायिकांसाठी पनवेल महापालिकेची बैठक

## सुचनांचे पालन करा; अन्यथा कठोर कारवाई –आयुक्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मनपा हद्दीतील बांधकाम व्यावसायिकांसाठी महापालिकेने दिलेल्या सुचनांचे पुर्णतः पालन करावे अन्यथा महानगरपालिकेच्या वतीने कठोर कारवाई करणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी केले. पनवेल मनपा कार्यक्षेत्रात बांधकामांच्या ठिकाणी धूळ प्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी मनपा क्षेत्रातील बांधकाम व्यवसायिकांची महापालिका मुख्यालयात बैठक घेण्यात आली या वेळी आयुक्त बोलत होते.



या बैठकीस अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, उपायुक्त स्वरूप खारगे, रचना सहाय्यक अनिकेत दुर्गावळे, मुख्य आरेखक नितीन हुद्दार उपस्थित होते. वायु प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक काटेकोरपणे राबविण्यावर महापालिका भर देत आहे. हवा प्रदूषण, स्वच्छता ,सुरक्षा व्यवस्था या संदर्भात महापालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम विकासकांनी योग्य ती काळजी घ्यावी, यासाठीच्या उपाय योजना विहीत काळात केले नाही तर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट सूचना या बैठकित आयुक्तांनी दिल्या.

या वेळी बांधकाम क्षेत्राशी निगडीत क्रिडाई, एमसीएचआय, बीएनएएम संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## निवडक

### अपघातात महिला जखमी

**पनवेल :** टेम्पोने दुचाकीला धडक देऊन झालेल्या अपघातात ७२ वर्षीय महिला जखमी झाली. या अपघाताप्रकरणी टेम्पोचालकाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात ३० डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. ३० डिसेंबर रोजी वैशाली करपे आणि त्यांची आई सुलोचना करपे या मॉर्निंग वॉकसाठी निघाल्या. सेक्टर ११ भाजी मार्केटच्या बाजूने चालत जात असताना चार चाकी टेम्पोने दूचाकीला धडक दिली आणि ती दुचाकी सुलोचना करपे यांना पाठीमागून येऊन जोरात धडकली. यात सुलोचना करपे गंभीर जखमी झाल्या.

### नाकाबंदीत पोलिसांना मारहाण

**पनवेल :** नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरात नाकाबंदी करीत असणाऱ्या पोलीस अंमलदाराला हुज्रत घालुन धक्काबुक्की केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नवीन वर्ष आगमन बंदोबस्त कामी शिवशंभो नाका पोलीस वाहतुक शाखा चौकी पनवेलसमोर रोडवर पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पवार नाकाबंदी करीत असताना आरोपी कल्पेश जुगे, प्रणय पाटील, तुळशीराम पवार यांनी पोलीस अंमलदारांशी सरकारी कर्तव्य बजावत असताना हुज्रत घालुन भांडण काढुन शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. या धक्काबुक्कीत पोहवा ज्ञानेश्वर पवार यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली. याप्रकरणी शासकिय कामात अडथळा निर्माण केला म्हणुन गुन्हा आरोपींवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### डॉ. हेमंत कडू यांना पुरस्कार

**उरण :** तालुक्यातील नवघर गावचे डॉ. हेमंत रामचंद्र कडू यांना ग्लोरी अचीव्हमेंट पुरस्कार सोहळा २०२५, या गौरवपूर्ण कार्यक्रमात संमोहन रत्न २०२५ पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक त्याचप्रमाणे उत्तम असे कार्य करणा–या अनेक व्यक्तींना संमोहन तज्ञ डॉ. विजय कुमार काळे आणि डॉ. रविकुमार काळे यांनी पुरस्कार प्रदान केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे डॉ.अरूण अडसूळ, श्रीशैल रामचंद्र चिवडशेट्टी, निलेश पांडूरंग माने, सुमित सुनावणे, आरती गव्हाळे, ॲड.राहूल सोनवणे आदी उपस्थिती होते. सुत्रसंचलन संगीता वाघ यांनी तर आभार अश्विनी जाधव यांनी मानले.



# दुकानातील कर्मचाऱ्याकडून अपहार करून मालकाची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एक लाख ९३ हजार रुपयांची बिले डिलीट करून ते पैसे स्वतःच्या फायद्यासाठी घेऊन दुकानात अपहार करून फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी संदीप सरोज याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २९ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

हरीश वैध यांचे फूड बास्केट नावाचे शॉप सेक्टर १०, कामोठे येथे आहे. त्यांच्या दुकानात संदीप सरोज हा काम करतो. त्यांनी युजर आयडी चालू केले. या वेळी युजर आयडीचा वापर दुसऱ्या कोणीतरी केला असल्याचे त्यांच्या लक्षात आले तसेच युजर आयडी आणि पासवर्डचा वापर करून बिल डिलीट केले असल्याचे दिसून आले. त्यांनी सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता संदीप सरोज हा कॅश काऊंटरवर उभा होता आणि त्याने दुकानातील बिलाचे पैसे कॅशमध्ये घेतलेले दिसत होते. आणि ते पुडित बांधून खिशात ठेवत असताना दिसून आले. एकूण एक लाख ९३ हजार ८० रुपयांची बिले त्याने डिलीट मारली.



**कामोठे : येथे नव्याने लॉन्ड्री असोसिएशनची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्ष सचिन काशिनाथ सोंडकर, उपाध्यक्ष अनिता कनोजिया, सचिव कैलासराम कनोजिया, उपसचिव पुनीत कुमार, खजिनदार रजनीशकुमार निर्मल, उपखजिनदार पवन बसंत कनोजिया, सदस्य मनोज कुमार, जनार्दन प्रसाद, राकेश रजक, पप्पूलाल निर्मल, संतोष कुमार चौधरी, गुलाब कनोजिया यांची निवड करण्यात आली. या नवीन कमिटीने माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांची सदिच्छा भेट घेतली.**

# नवीन वर्षाचे पनवेलकरांकडून स्वागत

## कायद्याच्या चौकटीत राहून केले सेलिब्रेशन

**पनवेल : वार्ताहर**

नववर्षाच्या स्वागतासाठी नवी मुंबई शहरात पोलिसांकडून कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. नवी मुंबई आणि पनवेल परिसरात एकूण २,५०० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते तसेच फार्म हाऊसवर होणाऱ्या पार्ट्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले होते. त्यामुळे पनवेलकरांनी नवीन वर्षाचे स्वागत करताना कोणतीही घटना घडली नाही, अशी माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली.



शांतताप्रिय असलेल्या पनवेल शहरात या नवीन वर्षाचे स्वागत शांततेत तसेच कायद्याच्या चौकटीत व्हावं यासाठी पोलीस अधिकारी वा कर्मचाऱ्यांचा फौज फाटा नवी मुंबई पोलिसांनी उतरवला होता. याअनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई आणि पनवेल परिसरात विविध ठिकाणी भेट देत सुरक्षेचा आढावा घेतला.

या वेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले कि, ड्रिंक अँड ड्राइव्ह, ओव्हरस्पीडिंग, बेकायदेशीर रेव्ह पार्टी आणि ड्रग्स विक्रीवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. तसेच शहरातील विविध ठिकाणी नाकाबंदी उभारण्यात आली असून, हॉटेल, रेस्टॉरंट आणि क्लब रात्री ४ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आले असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली.





**पनवेल : कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी नववर्षानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेत त्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी स्नेहन धाने, सुनीता मोहिते, निकेश पाडावे, प्रतिक कोळी आदी उपस्थित होते.**





















**पनवेल : दरवर्षीच्या परंपरेनुसार यंदाही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच शंकुतला ठाकूर यांची अनेक मान्यवरांनी भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले आणि त्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी आमदार महेश बालदी, भाजपचे फत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस तथा पनवेल महापालिकेचे बिनविरोध नगरसेवक नितीन पाटील, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक व उमेदवार ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका व उमेदवार दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, नीता माळी, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, राजेश गायकर, शहर उपाध्यक्ष प्रितम म्हात्रे, उमेश इनामदार, प्रसाद हनुमंते, यतिन देशमुख आदींनी शुभेच्छा दिल्या. या वेळी वर्षा ठाकूर, अपूर्व ठाकूर उपस्थित होते.**

## संपादकीय

# मोबाइल टाळण्याचा संकल्प

मोबाइलचे व्यसन ही आज जगभरात एक गंभीर समस्या बनत चालली आहे. पण २०२६ मध्ये जगभर 'ट्रेंड' म्हणावा असा नववर्षाचा संकल्प पुढे येतो आहे आणि तो आहे मोबाइलच्या व्यसनातून मुक्ती मिळवण्याचा, स्क्रीन टाइम कमी करण्याचा संकल्प. आणि हा संकल्प करण्यात 'जेन झी' सर्वात आघाडीवर आहे!

**नव्या वर्षात पाऊल ठेवताना सगळ्यांचीच मने आशाआकांक्षांनी भरलेली असतात. त्यातूनच जगभरात असंख्य लोक कळत-नकळत मनाशी काही संकल्प करतात. नवीन वर्षाचा संकल्प हे स्वत:त सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी स्वत:लाच दिलेले वचन असते. नव्या वर्षात आपण रोज चालायला जाणार, व्यायाम करणार, वजन घटवणार हे आजवर सर्वसाधारणपणे केले जाणारे संकल्प असत. पण २०२६ मध्ये जगभर 'ट्रेंड' दिसतो आहे तो मोबाइलच्या व्यसनातून मुक्ती मिळवण्याच्या संकल्पाचा. आणि आश्चर्याची बाब म्हणजे हा संकल्प करण्यात 'जेन झी' सर्वात आघाडीवर आहे. मोबाइलचे व्यसन ही जगभरातली गंभीर समस्या आहे. अनेकांमध्ये शारीरिक, मानसिक विकारांना मोबाइलचे व्यसन खतपाणी घालत असल्याचे स्पष्ट होत चालल्याने जगभरात आता 'डिजिटल डिटॉक्स'ची गरज जाणवते आहे. डिजिटल युगात मोबाइल ही गरजेची वस्तू बनली. पण मोबाइलच्या अतिवापरातून लोकांच्या कामाच्या क्षमतेवर आणि मानसिक-शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो आहे. आश्चर्य वाटेल, पण २०२५ मध्ये जागतिक स्तरावर लोकांचा दैनंदिन सरासरी स्क्रीन-टाइम हा तब्बल ६ तास ४५ मिनिटे इतका प्रचंड नोंदला गेला आहे. यात मोबाइलचा वापर ४ तास ३७ मिनिटे इतका आहे. भारतात लोक सर्वसाधारणपणे दिवसातले पाच तास मोबाइलवर घालवतात. यातला बहुसंख्य वेळ सोशल मीडिया, गेमिंग आणि मनोरंजनावर खर्च होतो. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवरच नव्हे तर एकंदर ताणातून मानसिक आरोग्यावरही मोठा दुष्परिणाम दिसतो आहे. घराघरांत पालक-मुले, पती-पत्नी या नात्यांमधील संवादही मोबाइलच्या अतिवापराने कमी होतो आहे. मोबाइलचे व्यसन म्हणजे काय, तर सारखे फोन उचलून कुठे काय आहे हे तपासावेसे वाटणे. जगभरातील स्मार्टफोन वापरणाऱ्यांपैकी २१ टक्के लोकांमध्ये आजच्या घडीला मोबाइलच्या व्यसनाची वैद्यकीय लक्षणे दिसतात. अनेक अभ्यासांतून, तज्ज्ञ डॉक्टरांकडून याविषयी गंभीर इशारा दिला जातो आहे. २०२६ मध्ये मोबाइलचा वापर वाढण्याचीच शक्यता अधिक असताना जेन झी त्याबाबत सजग होणे हे आशादायक आहे. याची गरजही होती. कारण जेन झी दिवसातले तब्बल नऊ तास मोबाइलच्या स्क्रीनवर घालवतात. अनेक घरांमध्ये पालकांना मुलाचे मोबाइलचे व्यसन कसे कमी करावे हे कळेनासे झाले आहे. त्यातून मुलात नैराश्य, आक्रमकता वाढीस लागल्याचे त्यांना दिसते आहे. मोबाइलच्या अतिवापरातून ताणात वाढ, नैराश्य, डोळ्यांचे विकार, मानेच्या, पाठीच्या समस्या, निद्रानाश व शारीरिक हालचाल घटल्याने वजनात वाढ या समस्या जगभरात दिसतात. वाहन चालवताना मोबाइल वापरल्याने अपघात होतात. या व्यसनावर उपाय काय? स्क्रीन टाइमसारख्या फीचरचा वापर करून प्सचा कालावधी मर्यादित केल्याने मोबाइलचा वापर कमी करता येईल. अनावश्यक नोटिफिकेशन कमी करून, जेवताना-झोपताना फोन कटाक्षाने दूर ठेवल्यास, सोशल मीडियासाठी विशिष्ट वेळ निश्चित केल्यास, अन्य छंदांसाठी वेळ काढल्यास, आठवड्यातून एक दिवस पूर्णपणे मोबाइलपासून दूर राहिल्यास मोबाइलचा वापर कमी करता येईल असे तज्ज्ञ सुचवतात. जेन झीचा 'डिजिटल डिटॉक्स'चा निर्धार खरे तर सगळ्यांनीच स्वीकारण्याजोगा आहे.**

# जिल्हा रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय वेळेत पूर्ण व्हायला हवे



**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

सीआरझेडची परवानगी मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या नूतन इमारतीचा मार्ग मोकळा झाला आहे. गेली अनेक दिवस रखडलेल्या अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या कामाला आता वेग आला आहे. त्यामुळे अनेक वर्ष ज्याची प्रतीक्षा होती ते जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत उभारण्याचे काम सुरू झाले आहे लवकरच अत्याधुनिक सोयीसुविधांनी सज्ज सात मजली रुग्णालय रायगडकरांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम देखील सुरू आहे. ही दोन्ही कामे वेळेत पूर्ण हेणे आवश्यक आहे. या दोन्ही इमारती पूर्ण झाल्या की रायगड जिल्ह्यात चांगल्या आरोग्य सेवा उपलबध्द होतील.

जिल्हा सामान्य रुग्णालयाची सध्या अस्त्वित असलेली आंतर रुग्ण विभागाची जुनी इमारत जीर्ण झाली आहे. गेली अनेक वर्षे या इमारतीच्या डागडुजीवर करोडो रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. आजही या इमारतीवर खर्च होत आहे. आजही जुन्या आंतर रुग्ण इमारतीत जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे. धोकादायक ठरलेल्या या जिल्हा सामान्य रुग्णालयाची नवीन इमारत बांधावी अशी मागणी वारंवार होत होती. रुग्णालयाच्या दुरावस्थेबाबत गांभीर्याने लक्ष देऊन तत्कालीन शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता. यात आमदार महेंद्र दळवी यांचाही पुढाकार होता. शासनाने सात मजली अद्यावत इमारत बांधण्यासाठी मंजुरी देऊन १०५ कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. ५ मार्च २०२५ रोजी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले होते. त्यामुळे लवकरच इमारीचे काम सुरू होईल अशी आशा होती.

मात्र सीआरझेडच्या परवानगीची अडचण होती. ही परवानगी मिळत नसल्याने काम रखडले होते. अखेर सीआरझेडची परवानगी मिळाल्यानंतर इमारत बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुणे येथील अजवानी कंपनीला नवीन इमारत बांधण्याचा ठेका मिळाला आहे. मागील पंधरा दिवसापासून खर्या अर्थाने इमारतीच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षात अद्यावत अशी सात मजली नवीन इमारत रायगडकरांच्या सेवेत दाखल होणार आहे.

जिल्हा रुग्णालय परिसरात २ लाख चौरस फूट बांधकाम करून ३०० बेडचे अद्यावत रुग्णालय उभारले जाणार आहे. त्यासाठी सात मजली इमारत बांधली जाणार आहे. या नवीन इमारतीतील दिडशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. केंद्राच्या नियमानुसार पब्लिक हेल्थ सेंटरच्या मान्यतेनुसार खाजगी पद्धतीचे अद्यावत असे बांधकाम केले जाणार आहे. ३०० बेडसह २० बेडचे स्वतंत्र अतिदक्षता विभाग असणार आहे. १६ बेडचे नवजात बालककक्ष, २० बेडचे डायलिसिस सेंटर, रुग्ण थांबा कक्ष, अपघात विभाग तसेच अपघात विभागात वेगळे शस्त्रक्रिया कक्षही उभारले जाणार आहे. इमारतीत पाच मोड्युलर अद्यावत अशा यंत्र सामुग्रीसह शस्त्रक्रिया कक्ष ही बांधले जाणार आहेत. यामध्ये अथम, अर्थो, जनरल, स्त्री रोग शस्त्रक्रिया कक्ष असणार असून एचआयव्ही, एचएसबी बधितासाठीही वेगळे शस्त्रक्रिया कक्ष असणार आहे. याशिवाय लाँड्री, पाककक्ष, क्षकिरण कक्ष, चार लिफ्ट, दोन जिने एक रॅम्प अशी सुविधा इमारतीमध्ये असणार आहे. त्यामुळे नागरिकांना अद्यावत अद्यावत इमारतीबरोबरच चांगल्या आरोग्य सुविधा मिळणार आहेत.

अलिबाग तालुक्यातील उसर येथे ५३ एकर जागेवर वैद्यकीय महाविद्यालयाची प्रशासकीय इमारत आणि ५०० खाटांचे सर्वोपचार रुग्णालयाची इमारत बांधली जाणार आहे. त्यातील ३५ एकर जमीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी वापरण्यात येईल. उर्वरित जागेत भविष्यात नर्सिंग कॉलेज तसेच इतर वैद्यकीय सुविधा उभारल्या जातील. रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागात चांगल्या आरोग्यसुविधा नाहीत. त्यामुळे दुर्धर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया यांसाठी आता मुंबई किवा पुण्यात जावे लागते. उसर येथील वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपाचार रुग्णाला सुरु झाल्यावर. चांगल्या आरोग्य सुविधा रायगडातील गरीब जनतेला मिळतील. त्याना उपचारासाठी मुंबई किवा पुण्यात जावे लागणार नाही. तीन वर्षात हे कामे पुर्ण होणे अपेक्षित होते. मात्र भुमिपुजन होऊन तीन वर्ष होत आले तरी इमारत पूर्ण झाली नाही. कही लोकांच्या विरोधामुळे या वैद्यकीय महाविद्यालयाचे काम काही वर्षे रखडले होते. मागील काही महिन्यांपासून या रूग्णलयाच्या कामाला देखील सुरूवात झाली आहे. शायकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामला देखील वेग आला आहे. जिल्हा शासकीय रुग्णालय आणि रायगड जिल्हा वैद्यकीय महाविद्यालय यांची रखडलेली कामे अता सुरू झाली आहेत. ही रुग्णालये सुरु झाल्यानंतर रायगडातील जनतेला चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होती. दुर्धर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया मुंबई , पुण्यात जावे लागणार नाही. भविष्याचा रायगड जिल्ह्याचा विचार करता जिल्हा शासकीय रूग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय लवकर पूर्ण करून ते सुरु करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

# भारतीय हवामान शास्त्रज्ञ वसंत गोवारीकर

वसंत रणछोड गोवारीकर हे भारतीय शास्त्रज्ञ होते. ते भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे संचालक होते आणि १९९१ ते १९९३ पर्यंत भारताच्या पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागारदेखील होते. गोवारीकर यांनी अंतराळ संशोधन, हवामान आणि लोकसंख्या या क्षेत्रात अमूल्य योगदान दिले.

मान्सूनचा अचूक अंदाज वर्तवणारे स्वदेशी हवामान अंदाज मॉडेल विकसित करणारे ते पहिले शास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी पुणे येथे झाला. पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी कोल्हापूरमध्ये घेतले आणि इंग्लंडच्या बर्मिंगहॅम विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. आणि पीएच.डी. ह्या पदव्या मिळवल्या. त्यानंतर ते हार्वेल येथील इंग्लंडच्या अणूऊर्जा संशोधन विभागात काम करू लागले.

१९७३ ते १९७९ या कालावधीत ते विक्रम साराभाई अंतराळ केंद्रात कार्यरत होते. १९७९ ते १९८५ मध्ये ते या केंद्राचे प्रमुख होते. त्यानंतर पाच वर्षे त्यांनी भारत सरकारच्या विज्ञान तंत्रज्ञान विभागाचे सचिव म्हणून काम केले. १९९१ ते १९९३ या कालावधीत त्यांनी पंतप्रधानांच्या सल्लागाराची भूमिका बजावली. त्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद स्वीकारले. मोसमी वार्यांचा पावसावर प्रभाव टाकणार्या १६ घटकांचा सखोल अभ्यास करून त्यांनी हवामानाचा अंदाज लावण्यासाठी एक आराखडा तयार केला.हा आराखडा खूपच यशस्वी ठरला आहे. त्यांनी बनवलेला खतांचा कोश संपूर्ण जगातला तसा पहिला कोश ठरला आणि त्याला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली. त्यांना भारतीय खगोल मंडळाच्या वतीने आर्यभट्ट पुरस्कार देण्यात आला होता. भारत सरकारच्या वतीने त्यांना पद्मश्री आणि पद्मभूषण हे सन्मान देऊन गौरविण्यात आले होते. अशा या भारतीय संशोधकाचे २ जानेवारी २०१५ रोजी निधन झाले. साभार: इंटरनेट




## मोटोरोला प्रीमियम स्मार्टफोन सिग्नेचर लॉन्च होणार

मोटोरोला कंपनीने सिग्नेचर ७ जानेवारी २०२६ रोजी लॉन्च करणार आहे मोटोरोला इंडियाने सोशल मीडियावर टीझर शेअर केला आहे, ज्यामध्ये प्रीमियम डिझाइनवर लक्ष केंद्रित केले आहे. हा फोन फ्लिपकार्ट, मोटोरोलाच्या अधिकृत साइट आणि इतर प्लॅटफॉर्मवर विक्रीसाठी उपलब्ध असेल.



मोटोरोला सिग्नेचरमध्ये फॅब्रिक फिनिश असलेला बॅक पॅनल मिळू शकतो. कंपनीने टीझरमध्ये याला प्रीमियम लुक देण्याबद्दल सांगितले आहे. मागील बाजूस स्क्वेअर आकाराचे कॅमेरा मॉड्यूल असेल, ज्यामध्ये ट्रिपल कॅमेरा सेटअप आणि डएऊफ्लॅश दिला आहे. फोनमध्ये मेटल फ्रेम आणि स्लिम बेझल्स असलेली फ्लॅट डिस्प्ले मिळण्याची अपेक्षा आहे.

अपेक्षित स्पेसिफिकेशन्स-लीक्सनुसार, मोटोरोला सिग्नेचरमध्ये स्नॅपड्रॅगन ८ जेन ५ प्रोसेसर मिळू शकतो. हा चिपसेट अजून नवीन आहे आणि उच्च कार्यक्षमता देईल. फोनमध्ये १६ जीबी पर्यंत रॅम आणि Android १६ आधारित Hello UI मिळण्याची माहिती आहे. डिस्प्ले ६.७ इंचाचा १.५K OLED असू शकतो.

कॅमेरा सेटअपचे तपशील

कॅमेरा विभागात ट्रिपल ५० मेगापिक्सल कॅमेरा सेटअप मिळेल. यात पेरिस्कोप टेलीफोटो लेन्सचाही समावेश असू शकतो, जो दूरचे फोटो उत्तम प्रकारे कॅप्चर करेल. समोरच्या बाजूला उच्च रिझोल्यूशनचा सेल्फी कॅमेरा दिला जाईल. काही लीक्समध्ये स्टाइलस सपोर्टबद्दलही बोलले गेले आहे.

प्रीमियम सिरीज म्हणून स्थान

मोटोरोला या फोनला आपल्या नवीन सिग्नेचर सिरीजमधील पहिले डिव्हाइस सांगत आहे. कंपनीचे लक्ष डिझाइन आणि इनोव्हेशनवर आहे. टीझरमध्ये म्हटले आहे की, आजच्या काळात जिथे सर्व काही सारखेच वाटते, तिथे प्रीमियमला आपली स्वतःची ओळख (सिग्नेचर) हवी आहे. काही रिपोर्ट्समध्ये याला मोटोरोला एज ७० अल्ट्राचे री-ब्रँड म्हटले जात आहे.

किंमत आणि उपलब्धता

किंमतीची अधिकृत माहिती अजून आलेली नाही, परंतु मागील एज अल्ट्रा मॉडेलप्रमाणे ती ६०,००० रुपयांच्या आसपास असू शकते. लॉन्च झाल्यानंतर हा फोन फ्लिपकार्टवर सर्वात आधी उपलब्ध होईल.

# विठ्ठल लक्ष्मण कोतवाल उर्फ भाई कोतवाल



**निमित्त**

वीर भाई कोतवाल यांचा जन्म नाभिक समाजातील एका गरीब कुटुंबात दि. १ डिसेंबर १९१२ रोजी रायगड जिल्ह्यातील माथेरान या ठिकाणी झाला. इयत्ता चौथी पर्यंतचे शिक्षण माथेरानच्या शाळेमध्ये घेतल्यानंतर पुढील शिक्षण घेण्यासाठी ते पुण्यात आले. पुण्यामध्ये ते त्यांच्या आत्या गौरीताई हळदे यांच्याकडे राहिले. पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी पुण्यातील वाडिया कॉलेज मधून पूर्ण केले. पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊन ते माथेरानला परतले. पुढे कायद्याचे शिक्षण त्यांनी मुंबईमध्ये पूर्ण केले. १९४१ मध्ये ते वकील झाले.

पुण्यामध्ये असताना१९३५ मध्ये त्यांचा विवाह इंदू तुकाराम तीर्लापुरकर यांच्याशी झाला. पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊन परतल्यानंतर भाई कोतवाल यांनी त्यांचे जीवन समाजकार्याला वाहून घेतले. सायक्लोनमध्ये वाताहत झालेल्या पश्चिम मुंबईच्या रहीवासी आणि मच्छिमार बांधवांच्या मदतकार्यात ते पुढे आले. सावकारी पाशातून गरीब शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी त्यांनी सहकारी तत्वावर धान्यकोठी सुरु केल्या. गरिबांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी लढा दिला. सर्वसामान्य लोकांना मतदार यादीत नोंदणी करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. गरीब शेतकऱ्यांच्या मुलांसाठी त्यांनी एकूण ४२ व्हॉलेंटरी शाळा सुरु केल्या. सन १९४० मध्ये त्यांनी कामगार व मजूर यांना एकत्र आणले, त्यावेळी अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, लालजी पेंडसे यांसारखे दिग्गज नेते उपस्थित होते. १९४१ मध्ये माथेरान नगरपरिषदेची निवडणूक जिंकून ते नगरपरिषदेचे व्हाईस चेअरमन झाले.

महात्मा गांधी यांनी ब्रिटीश राजवटीला चले जाव चा नारा दिला त्यावेळी भाई कोतवाल सुद्धा उपस्थित होते. ब्रिटीश सरकारने सर्व नेत्यांची अटक सुरु केली. भाई कोतवाल यांच्यावरही अटक वॉरंट निघाले त्यावेळी जगेन तर स्वातंत्र्यात नाहीतर स्वर्गात अशी शपथ घेऊन भूमिगत झाले.भाई कोतवाल यांनी भूमिगत होऊन एक समांतर सरकार चालवायला सुरवात केली.त्यासाठी त्यांनी आगरी, कातकरी, व्हॉलेंटरी शिक्षक, शेतकरी यांचा एक दस्ता बनविला. यामध्ये जवळपास ५० वीरांचा समावेश होता . तो दस्ता म्हणजेच कोतवाल दस्ता.

ब्रिटीश सरकारला नामोहरम करण्यासाठी मुंबईला होणारा वीज पुरवठा तोडण्याचे त्यांनी ठरविले. सप्टेंबर १९४२ ते नोव्हेंबर १९४२ या दरम्यानच्या काळात त्यांनी एकूण ११ विजेचे मनोरे उद्ध्वस्त करून ब्रिटीश उद्योग आणि रेल्वे ठप्प करून टाकली. नामोहरम झालेल्या ब्रिटीश सरकारने भाई कोतवाल यांना पकडण्यासाठी आर हॉल आणि स्ताफोर्ड या विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. तसेच रुपये २५०० रोख इनाम जाहीर केले. मुरबाड तालुक्यात सिधगढच्या जंगलामध्ये होता. दि. २ जानेवारी १९४३ रोजी पहाटे आझाद हिंद दस्ता दुसऱ्या सुरक्षित ठीकाणी निघण्याच्या तयारीत असतानाच हॉल याने त्यांना अत्यंत जवळून गोळी झाडली आणि तेथेच या थोर वीराच्या जीवनाचा अंत झाला.

साभार - इंटरनेट

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## हिवाळ्यात मुलांची प्रतिकारशक्ती मजबूत बनवा

हिवाळ्यात मुलांमध्ये सर्दी-खोकला वाढतो कारण विषाणू थंड आणि कोरड्या हवेत जास्त काळ जिवंत राहतात. मुले बहुतेक घरातच राहतात, ज्यामुळे संसर्ग लवकर पसरतो. प्रत्येक शिंक थांबवणे कठीण आहे, परंतु काही सोप्या सवयी अवलंबून मुलांना निरोगी ठेवता येते.



१. दैनंदिन स्वच्छतेची दिनचर्या

मुलांना शाळेतून आल्यावर, शौचालयानंतर आणि जेवणापूर्वी हात धुण्याची सवय लावा. साबणाने २० सेकंद हात धुणे दैनंदिन वापरासाठी सॅनिटायझरपेक्षा चांगले आहे.

खोकला किंवा शिंक आल्यास कोपरात तोंड झाकण्यास आणि डोळे-नाक स्पर्श करणे टाळण्यास शिकवा. घरात चांगल्या सुगंधासोबत ताजी हवाही येऊ द्या. त्यासाठी सकाळी घराच्या खिडक्या १० मिनिटांसाठी उघडा.

२. नाकाची काळजी

शाळेत जाण्यापूर्वी आणि झोपण्यापूर्वी ०.६५% सलाइन नोज स्प्रे द्या. हे नाक ओलसर ठेवते आणि कफ साफ करते. ६ वर्षांवरील मुलांना ३-५ मिनिटे वाफ दिली जाऊ शकते. लहान मुलांना भाजण्याचा धोका असतो, त्यामुळे त्यांना वाफ देऊ नका.

३. झोप - सायलेंट इम्युन बूस्टर

३-५ वर्षांच्या मुलांना १०-१३ तास, ६-१२ वर्षांच्या मुलांना ९-१२ तास आणि किशोरवयीन मुलांना ८-१० तास झोप आवश्यक आहे. झोपण्यापूर्वी २०-३० मिनिटे स्क्रीन बंद करा, कोमट पाण्याने अंघोळ घाला. सकाळी १० मिनिटे सूर्यप्रकाश घेतल्याने बॉडी क्लॉक स्थिर राहते आणि झोप सुधारते.

४. जेवणाची थाळी पहिली सुरक्षा

प्रत्येक जेवणात प्रथिने, रंगीबेरंगी भाज्या आणि गरम द्रवपदार्थ समाविष्ट करा. प्रथिन्यांसाठी अंडे, डाळी, पनीर/टोफू आणि दही द्या. व्हिटॅमिन सी साठी आहारात पेरू, आवळा, संत्री, टोमॅटो किंवा ढोबळी मिरची रोज समाविष्ट करा.

झिंकसाठी भाजलेले हरभरे, भोपळ्याच्या बिया, अंडी आणि डाळी द्या. प्रोबायोटिकसाठी ताजे दही किंवा ताक द्या. गरम सूप आणि हलका काढा, लिंबू-आले आणि तुळस देखील मुलांना द्या. थंडीत मुले पाणी कमी पितात, म्हणून पाण्याचे वेळापत्रक तयार करा.

# पोलादपूरकरांनी वणवे रोखण्यासाठी अन् विझविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात वणवेविरोधी अभियान हे वणवे विझून गेल्यानंतर सुरू होत असल्याने आता तालुकावासियांनी वणवे रोकण्यासाठी अन् विझविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या वर्षअखेरिस झालेल्या वन्यजीवगणनेमध्ये या वणव्यांचा अडसर निर्माण झाल्याचे वन्यजीवांच्या पावलांच्या ठशांवर तसेच विष्ठेवर जळलेल्या रोपे तसेच झाडांचे अवशेष आल्याने स्पष्ट झाले आहे.



पोलादपूर तालुक्यात मार्गशीर्ष महिन्यापासून सुरू झालेले वणवे वैशाख महिन्याच्या मध्यावर म्हणजे तब्बल साडेपाच महिने सुरू राहणार असून त्यानंतरही पारंपरिक शेतीचा एक अविभाज्य भाग म्हणून शेतात जाळले जाणारे तरवे उन्हाची झळ अनुभविण्यास लावणारी झळ सोसावयास लावणार आहेत. गेल्य काही वर्षांमध्ये सवाद येथे एका गवताची उडवी जळण्याचा तर कापडे फौजदारवाडीसह धामणदिवी, सडे, सवाद, कोतवाल बुद्रुक आणि कोंढवी येथे वाडा जळून गुरे होरपळल्याच्या दूर्घटना गेल्या दोन वर्षांत झाल्या आहेत. तालुक्यात संध्याकाळी उंच डोंगरावर विद्युत रोषणाई केल्यासारखे वणव्यांचे दृश्य मनोहारी दिसत असले तरी हे वणवे भर दुपारी जेव्हा पेटतात तेव्हा पाणी टंचाई असलेल्या या तालुक्यात शेतकऱ्यांना त्यावर नियंत्रण ठेवणे देखील अशक्य होत आहे. पोलादपूर तालुक्यातील माळरानावरील गवताचे प्रमाण पाहता ते तालुक्याला पशुधन संगोपनासाठी दुधदुभता तालुका अशी ओळख देण्यास उपयुक्त आहे. मात्र, तरीही नेमेचि येतो मग पावसाळा...प्रमाणे दरवर्षी लागतात येथे वणवे...असा दाहक अनुभव शेतकरी घेताना दिसत आहेत.

दोन वर्षांपूर्वी डोंगरावर पेटते कापडी बोळे फेकून वणवे लावणाऱ्या दोघा मोटारसायकलस्वारांचा व्हिडीओ सोशलमिडीयावरून व्हायरल झाला तेव्हा हे वणवे कोळसानिर्मितीसाठी लावले जाऊन वणवे विझल्यानंतर मोठया प्रमाणात कोळसा गोळा करण्यात येत असल्याचे लक्षात आले. मात्र, हे दोघे निसटण्यात यशस्वी झाले. २०२५ मध्ये डिसेंबर महिन्यात पोलादपूरच्या ४ हजार हेक्टर वनक्षेत्रामध्ये वन्यजीवगणना सुरू असताना केवळ कोल्हे, साळींदर आणि भेकरीचे अस्तित्वाचे पुसट संकेत प्राप्त झाले आहेत. मात्र, बिबटयाचे पाळीव प्राण्यांवरील हल्ले आणि अन्य वन्यपशूंचे वनातील वास्तव्य दर्शविणारे विष्ठा, पावलांचे ठसे, अन्य पाळीव प्राण्यांना मारलेल्या पंजांच्या नखांच्या खुणा, झाडांना नखांनी ओरबाडणे असे संकेत वणव्यांमुळे दिसून आले नसल्याचे वनरक्षक आणि वनपालाचे म्हणणे आहे. वनवणा प्रतिबंधक सप्ताहाचे आयोजन हे फेब्रुवारी महिन्याच्या १ ते ७ तारखेपर्यंत केले जात असले तरी तत्पूर्वीच वणव्यांची तीव्रता अधिक असल्याने पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी आता वणवे विझविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

पोलादपूर तालुक्यात वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे वन्यजीवांनी वनक्षेत्रातून पळ काढल्याचे स्पष्ट झाले असताना वनक्षेत्रात वन्य पक्ष्यांचा वणव्याच्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडून होरपळून मृत्यू झाल्याच्या तक्रारीदेखील वनक्षेत्राच्या वनपालांकडे गेल्या वर्षी प्राप्त झाल्या आहेत. पोलादपूर नगरपंचायतीकडे अग्निशमन यंत्रणा नसल्याने महाड नगरपरिषद आणि महाड एमआयडीसीतील अग्निशमन यंत्रणांना पाचारण करून वणवे विझविण्यात आले आहेत. त्यामुळे पोलादपूर तालुक्यात अग्निशमन यंत्रणेची गरज ध्वनित झाली असली तरी सध्यातरी पोलादपूरकरांनाच वणवे प्रतिबंधासाठी तसेच विझविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

# पोलादपूर विद्यामंदिरचे विद्यार्थी २५ वर्षांनंतर पुन्हा भेटले



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिरामध्ये २००० ते २००१ या शैक्षणिक वर्षामध्ये दहावा शिकत असलेल्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी गेल्या ७-८ वर्षापासून स्नेह मेळावा आयोजित करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता. अखेरीस सर्वांच्या प्रयत्नांमधून इच्छाशक्ती आणि भेटण्याच्या ओढीमुळे रविवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी मोरगिरी रोड मैत्री गार्डन येथे सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत जल्लोषात तसेच आनंदात स्नेहमेळावा यशस्वी झाला.

सर्वांचे लाडके शिक्षक बी.जी. पाटील सर यांनी स्नेहमेळाव्यास प्रेरित केल्यामुळे सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ. अस्मिता तलाठी मॅडम व मुख्याध्यापक शेठ सर यांनी या स्नेहमेळाव्यास उपस्थित राहून विद्यार्थ्यांची ओळख आणि विचारपूस करून मराठी माध्यमिक शाळेचे महत्त्व आणि आजची बदलत चाललेली जीवनशैली याविषयी आपले मार्गदर्शन करत आपले उज्वल भवितव्य कसे असावे, याविषयी विचार व्यक्त केले.

हा स्नेह मेळावा यशस्वी करण्याकरिता प्रत्येकाने आपआपल्या परीने सहयोग दिला. यामध्ये प्रामुख्याने सुहास कळमकर, हरीश मोरे, सारिका बोरकर-महाडिक, स्वाती दीक्षित-महामुनी या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनीनी संपर्क साधत नियोजनात पोलादपूरमधील स्थानिक माजी विद्यार्थी प्रसाद उर्फ बंटी शहा, निलेश आंबेतकर, निहाल कुडाळकर आणि चिंचवड-पुणे येथील विजयेंद्र कोळसकर या सर्वांना सोबत घेऊन स्थानिक रहिवासी डेकोरेशन क्षेत्रातील व्यावसायिक अमित दरेकर, हॉटेल व्यवसायिक अमित भुवड, फोटोग्राफर वैभव साळवी या सर्वांचे मनापासून आभार मानले. रयत विद्यामंदिराच्या अनेक माजी विद्यार्थिनी-विद्यार्थ्यांनी उच्चपदस्थ नोकरी मिळवित व्यवसायातदेखील उच्च स्थान प्राप्त केले आहे. या कार्यक्रमासाठी मुंबई, पनवेल, पुणे, रत्नागिरी, अकलूज या ठिकाणाहून स्नेहमेळाव्यास आनंद साजरा केला. धुळे येथील माजी विद्यार्थी व व्यावसायिक ऑर्केस्ट्रा कलावंत योगेश गोपाळ यांनी स्नेहमेळाव्याचे सूत्रसंचालन करण्यासह सुश्राव्य गीतगायन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

प्रारंभी दिवंगत माजी विद्याथी-विद्यार्थिनींना श्रध्दांजली वाहण्यात आली. सुमारे ४० पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थिनींना स्नेह मेळाव्याप्रसंगी उपस्थित राहून जुन्या सहअध्यायींना भेटण्याची ओढ स्पष्ट केली. यावेळी माजी विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी संगीतखुर्ची, खोखो, कबड्डी, गप्पागोष्टी, रेकॉर्डडान्स अशा विविध उपक्रमांच्या सादरीकरणाने पुन्हा एक दिवस बालपण अनुभवले. यावेळी शिक्षक आणि माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांना भेटवस्तू देण्यात आल्या .

# मोर्बा स्कूलमध्ये कृषी महोत्सव व प्रदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या युनायटेड एज्युकेशन अँड ट्रस्ट संचालित युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा शाळेने प्रथमच शाळेच्या मैदानावर कृषी महोत्सव व कृषी प्रदर्शन म्हणजेच फार्मर फेस्टा कार्यक्रम बुधवारी (दि.३१) आयोजित केला होता. या महोत्सवाला उत्स्फुर्त असा प्रतिसाद लाभला. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी साकारलेल्या आकर्षक प्रतिकृतींचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.

मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कुलने शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील विकासाबरोबरच विद्यार्थी व पालकांना वेगवेगळ्या गोष्टींची माहिती व्हावी यासाठी हि शाळा वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवित असते. या शाळेने शेतीकडे लक्ष देऊन प्रथमच कृषी महोत्सव व कृषी प्रदर्शनाचे तसेच कृषी दिनाचे शानदार आयोजन शाळेत केले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन माणगाव तालुका कृषी अधिकारी रवी शंकर कावळे व पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्याहस्ते फित कापून करण्यात आले. या कार्यक्रमास कृषी अधिकारी मधुकर शेंडे, कृषी अधिकारी प्रतीक बांगर, शाळेचे विश्वस्त आसफ पल्लवकर, आयडियल इंग्लिश स्कुल महाडचे मुख्याध्यापक संभाजीराव सूर्यवंशी, याकूब मुकादम, फैझ सरखोत, शाळेच्या मुख्याध्यापिका रुबिना बडे, शेतकरी विठोबा पालकर, राकेश पोवार, गजानन पोवार, महेश पोवार, दिपक पोवार आदींसह शाळेचे सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कुलने साकारलेल्या या कृषी प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे हुबेहूब असे जीवनमान तसेच जुन्या काळातील शेती व आहार पद्धती,जुने खेळ,परंपरा यांचे उत्कृष्टपणे प्रदर्शन मांडले होते. हे प्रदर्शन पाहून उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या मुख्याध्यापिका रुबिना बडे, शाळेचे सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व विद्यार्थी यांचे विशेष कौतुक केले.

या वेळी मार्गदर्शन करताना तालुका कृषी अधिकारी रवी शंकर कावळे यांनी सुरवातीलाच युनायटेड स्कूलचे हा स्तुत्य उपक्रम साकारल्याने कौतुक केले. ते म्हणाले भारत हा कृषी प्रदान देश आहे. कृषी विभागाच्या भरपूर योजना आहेत. कोरोना काळात भारतीय अर्थव्यवस्था तारण्याचे काम कृषी विभागाने केले आहे .



# नवीन वर्षाचे स्वागत अनेकांनी केले देवदर्शनाने

**चौक : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी भाविकांनी सुरुवात देवदर्शनाने केली. आज महड येथे श्री वरद विनायक आणि पळसदरी येथे श्री स्वामी समर्थ यांच्या मठात तुफान गर्दी झाली होती.




थर्टी फर्स्ट (३१ डिसेंबर) म्हटले की चालू वर्षाला निरोप देणे म्हणजे मद्यपान,नाचगाणी, पिकनिक, धमाल मस्ती असाच काहींना प्रकार वाटत असे, त्यामुळे नवीन वर्षाची सुरुवात अशा लोकांना माहित नव्हती. काल ३१ डिसेंबर २५ रोजी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी भाविक भक्त यांनी धार्मिक स्थळे येथे जाणे पसंद केले. खालापूर तालुक्यात अष्टविनायक क्षेत्र महड येथे व कर्जत तालुक्यातील श्री क्षेत्र स्वामी समर्थ पळसदरी मठात रात्री पासुन भाविकांची वर्दळ सुरू झाली होती. या दोन्ही ठिकाणी तुफान भाविकांची गर्दी उसळली होती.

आज नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी देखील गर्दी एवढी झाली की महड येथे मोठ्या गाड्या यांना प्रवेश बंद केल्याने जुन्या मुंबई पुणे रस्त्यावर हाल गावच्या हद्दीत मोकळ्या जागेत व जुन्या मार्गावर मोकळ्या जागेत पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आली, तर श्री स्वामी समर्थ पळसदरी येथेही माळरानावर गाड्या उभ्या करून भाविकांनी दर्शन घेतले, दोन्ही ठिकाणी सुमारे एक ते दीड किमी. देव दर्शन आणि मुख दर्शन अशी वेगळी रांग लावली होती.

एवढ्या गर्दीत देखील भाविकांनी कसलीही आरडाओरड न करता दर्शन घेऊन नवीन वर्षाचे स्वागत केले. नवीन वर्षाचा संकल्प देवदर्शनाने झाल्याने वेस्टर्न कल्चर कडे झुकलेली तरुण पिढी नाविन्य पूर्ण उपक्रम सुरू करतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :-mahad.ee@mahapwd.gov.inPh.No. (02145) 222167**
**निविदा सूचना क्रमांक ५९ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्यत्या वर्गातील नोंदणी कृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पद्म विभूषण पांडुरंगशास्त्री आठवले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हसळा, इमारतीची दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड . | ४०९९४४८/- | ४१०००/- | ५९०/- | ६महिने | वर्ग पाच |
| २ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रीवर्धन, इमारतीचे दुरूस्तीची कामे करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड . | ६०५७९८५/- | ६१०००/- | ५९०/- | ६महिने | वर्ग चार अ |
| ३ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था महाड जि. रायगड या संस्थेतील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड . | ६५५५९६७/- | ६६०००/- | ५९०/- | ६महिने | वर्ग चार अ |
| ४ | औद्योगिक प्रशिक्षण संस्ता महाड जि. रायगड या संस्थेतील आवारभिंतीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड . | ७१५८५२१/- | ७२०००/- | ५९०/- | ६महिने | वर्ग चार अ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०२/०१/२०२६ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ०८/०१/२०२६ वेळ १८.०० वाजे पर्यंत |
| २ | ऑनलाईन व्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक ११/०१/२०२६ वेळ १०.०० वाजता |

टिप:-परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

सही/-
कार्यकारी अभियंता
महाड ( सा.बां.) विभाग महाड

जा.क्र. मवि/लेश/निविदा/४९८१
दिनांक : ३१/१२/२०२५
आरओसी/२०२५-२६/क्र.५/सी ४९३६



**लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनि. कॉलेज, कामोठे**
सेक्टर-६A, प्लॉट नं. ४०, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१०२०९
फोन नं. ०९८६७०३१२३२ Email - kamotheemsrr@gmail.com

**शालेय बसची विक्री**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनि. कॉलेज, कामोठेच्या मालकीची शालेय बस विक्री जशी आहे जिथे आहे या तत्वावर विक्री केली जाणार आहे.

| | |
|---|---|
| वाहनाचे नाव | टाटा मोटर्स लि. (TATA MOTORS LTD) |
| आसन क्षमता | 054 |
| उत्पादन वर्ष | 2016 |

शालेय बसच्या अधिक तपशीलासाठी स्कूलच्या कामकाजाच्या दिवसात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत संपर्क साधा आणि या बसच्या खरेदीसाठी दि. ११/०१/२०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत कोटेशन सादर करावे.

**प्राचार्या**
**लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनि. कॉलेज, कामोठे**


मा. राठोड साहेब कोर्ट
ॲड. प्रणाली सोहनी

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील में दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज नं १७५७/२०२५
नि.नं ८/ड
ने ता. १३/२/२०२६

१. श्री. जयदीप मालती धुमाळ
वय- ३३ वर्षे, धंदा - नोकरी
२. श्रीमती बेबी मारुती धुमाळ
वय- ६४ वर्षे, धंदा - गृहिणी
दोघेही रा.प्लॉट नं १७५ रुम २०२,
श्री कृपा चिंतामणी बिल्डिंग सेक्टर
आर ४ वडघर, ता. पनवेल,जि.रायगड — अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस हया जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की.. अर्जदार नं. १ यांचे वडिल व अर्जदार नं. २ चे पती के मारुती जनार्दन धुमाळ हे ता. १३/३/२५ रोजी प्लॉट नं १७५, रुम नं २०२. श्री कृपा चिंतामणी बिल्डिंग, सेक्टर आर ४, वडघर, ता पनवेल जि. रायगड येथे निधन झाले आहेत त्यांना अर्जदार १ व २ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. के मारुती जनार्दन धुमाळ यांचे नांव असलेल्या जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| गांव / युनिट केस नं | सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ |
|---|---|---|---|
| कोपर/ ८४ | ५३ | ५ | ०-११-८ |
| | ५३ | २० | ०-१०-० |
| | ५३ | २३ | ०-१६-८ |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै मारुती जनार्दन धुमाळ यांस गांवठाण विस्तार योजने अंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड कै. मारुती जनार्दन धुमाळ यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयांत अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे

तरी अर्जदार हयांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या में कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्यापुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. आज १/१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी ता सदरची जाहीर नोटीस दिली

**सही/-**
**क लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश**
**क स्तर पनवेल**

## जाहीर सूचना

माझे पक्षकार कर्तव्या योगेश तांडेल व १ राहणार मौजे धानकान्हे, ता. रोहा, जि. रायगड, यांच्या वतीने सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस कळवितो की, खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा शोध अहवाल (Title Search) करण्याच्या अनुषंगाने ही जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**मौजे धानकान्हे, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन....**

| सर्व्हे नंबर | गावाचे नाव | भोगवटदाराचे नाव | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु. पै |
|---|---|---|---|---|
| 368 | धानकान्हे | कर्तव्या योगेश तांडेल<br>महेंद्र नागेश तांडेल | 0.45.65 | 9.16 |

सदर मिळकतीबाबत कोणास काही हक्क, हिस्सा, दावा, तारण, बोजा, करार, विक्री करार, दानपत्र, बक्षीसपत्र, कर्ज, लीज, भाडेपट्टा, वसीयत, वारसाहक्क किंवा इतर कोणताही दावा/हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात आवश्यक पुराव्यांसह कळवावे. वरील मुदतीत कोणताही दावा/हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीबाबत कोणाचाही दावा नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल.

दि. ०१/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. विजयेंद्र बी. शितोळे**
०३. श्री हरेकृष्णा सी.एच.एस.,
सेक्टर-०५, न्यू पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड ८६५७९७७९४१

## जाहीर सूचना

माझे पक्षकार श्री जोमा गोविंद तांडेल राहणार मौजे धानकान्हे, ता. रोहा, जि. रायगड, यांच्या वतीने सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस कळवितो की, खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा शोध अहवाल (Title Search) करण्याच्या अनुषंगाने ही जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**मौजे धानकान्हे, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन....**

| सर्व्हे नंबर | गावाचे नाव | भोगवटदाराचे नाव | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु. पै |
|---|---|---|---|---|
| 424 | धानकान्हे | जोमा गोविंद तांडेल | 0.16.00<br>0.02.00<br>0.18.00 | 0.11 |
| 447 | धानकान्हे | जोमा गोविंद तांडेल | 0.14.00<br>002.00<br>0.16.00 | 0.11 |
| 461 | धानकान्हे | जोमा गोविंद तांडेल | 0.56.00<br>0.07.00<br>0.63.00 | 0.42 |
| 466 | धानकान्हे | जोमा गोविंद तांडेल | 0.95.00<br>0.08.00<br>1.03.00 | 0.73 |
| 488 | धानकान्हे | जोमा गोविंद तांडेल | 0.09.00<br>0.01.00<br>0.10.00 | 0.80 |

सदर मिळकतीबाबत कोणास काही हक्क, हिस्सा, दावा, तारण, बोजा, करार, विक्री करार, दानपत्र, बक्षीसपत्र, कर्ज, लीज, भाडेपट्टा, वसीयत, वारसाहक्क किंवा इतर कोणताही दावा/हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात आवश्यक पुराव्यांसह कळवावे. वरील मुदतीत कोणताही दावा/हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीबाबत कोणाचाही दावा नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल.

दि. ०१/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. विजयेंद्र बी. शितोळे**
०३. श्री हरेकृष्णा सी.एच.एस.,
सेक्टर-०५, न्यू पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड ८६५७९७७९४१

# नवी मुंबईची हवा झाली दुषित

## वायू गुणवत्ता निर्देशांक वाढून ४०७च्या धोकादायक पातळीवर



**नवी मुंबई : बातमीदार**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला नवी मुंबई या नियोजित शहराचा वायू गुणवत्ता निर्देशांक वाढून ४०७ च्या 'धोकादायक' पातळीवर पोहोचला, ज्यामुळे पर्यावरणवाद्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांनी इशारा दिला आहे की शहर एका गंभीर सार्वजनिक आरोग्य संकटाच्या दिशेने वाटचाल करत आहे. एक्यूआय. इन या संपूर्ण भारतातील हवेच्या गुणवत्तेचा रिअल-टाइम मागोवा घेणाऱ्या ओपन-सोर्स प्लॅटफॉर्मनुसार, या पातळीवरील हवेत श्वास घेणे हे दिवसाला ७.३ सिगारेट ओढण्यासारखे आहे.

हवामान ट्रेंड विश्लेषणानुसार, नवी मुंबईत वाढत्या प्रमाणात अस्थिर आणि अत्यंत तीव्र परिस्थितीचा अनुभव येत आहे, जे शमन, अनुकूलन आणि आपत्कालीन तयारीच्या तातडीच्या गरजेवर जोर देते. तीव्रतेचे गुण वाढत असल्याने, लक्ष नियमित देखरेखीवरून संकट प्रतिसादाकडे वळले पाहिजे, असे एक्यूआय पोर्टल नमूद करते. या प्लॅटफॉर्मला नवी दिल्लीस्थित पर्यावरण तंत्रज्ञान कंपनी प्युअरलॉजिक लॅब्सचे संस्थापक रोहित बन्सल यांनी प्रोत्साहन दिले आहे.

आकडेवारीनुसार, हवेची गुणवत्ता रातोरात वेगाने खालावली. पर्यावरण देखरेख संस्था नॅटकनेक्ट फाउंडेशनने सांगितले की, मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास एक्यूआय 'गंभीर' २६२ होता, जो आठ तासांत वाढून 'धोकादायक' ४०६ वर पोहोचला. या संस्थेने अधिकाऱ्यांकडून तातडीने सुधारणात्मक कारवाईची मागणी करण्यासाठी आपली मोहीम तीव्र केली आहे.

नॅटकनेक्टने मुख्यमंत्री, नवी मुंबई आणि पनवेलचे महापालिका आयुक्त आणि राज्याच्या पर्यावरण संचालकांना नव्याने पत्र लिहून, त्यांनी बिघडत चाललेल्या वायू आणीबाणीची गंभीर दखल घ्यावी, असे आवाहन केले आहे.

अनियंत्रित बांधकाम, अवजड वाहनांची वाहतूक, वाहनांमधून होणारे उत्सर्जन आणि औद्योगिक क्रियाकलापांमुळे शहरावर धूळ आणि प्रदूषणाचे आवरण पसरले आहे, असे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले. नुकत्याच सुरू झालेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांचे स्वागत करण्याची ही योग्य पद्धत नाही.

साडेचार दशकांहून अधिक काळ नवी मुंबईचे रहिवासी असलेल्या कुमार यांनी सांगितले की, रुग्णालयातील आकडेवारीची वाट न पाहता आरोग्यावरील परिणाम स्पष्टपणे दिसत आहे. जवळजवळ प्रत्येक कुटुंब सर्दी, खोकला, शिंका आणि घशाच्या संसर्गाशी झुंज देत आहे, असे ते म्हणाले.

मुंबईच्या अलीकडील प्रवासाचे वर्णन करताना कुमार म्हणाले की, त्यांनी नवी मुंबईतून बाहेर पडणाऱ्या दगडांच्या चिप्सने भरलेल्या किमान २० डंप ट्रकची गणना केली. जेव्हा जेव्हा हे ट्रक ब्रेक लावतात, तेव्हा दगडांच्या धुळीचे लोट रस्त्यावर पसरतात आणि थेट हवेत मिसळतात, असे ते म्हणाले, आणि याला प्रदेशातील अनियंत्रित खाणकामाचा स्पष्ट पुरावा म्हटले. एनएच-३४८ वरील गावन फाटा-पनवेल पट्ट्यात खाणकाम आणि दगड फोडण्याच्या कामांमुळे दाट धूळ उडत असून, ही कामे कोणत्याही प्रमाणित कार्यप्रणालीशिवाय (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर) सुरू असल्याने तेथील परिस्थिती 'भयानक' झाली आहे, असा आरोप त्यांनी केला.

बांधकामाच्या प्रमाणित कार्यप्रणाली केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचे दिसते, असे 'उर्वरी'च्या संस्थापक वसुंधरा गुप्ते म्हणाल्या. ही एक ना-नफा संस्था आहे, जिने अलीकडेच ढासळणाऱ्या वायू गुणवत्ता निर्देशांकाकडे लक्ष वेधण्यासाठी वाशीच्या मिनी सी-शोर येथे 'जनरेशन-झेड'ची मूक मानवी साखळी आयोजित केली होती.

प्रत्येक रहिवाशामागे किमान तीन झाडे असण्याची शिफारस असताना, शहरात प्रति रहिवासी जेमतेम एकच झाड आहे. त्यामुळे प्रदूषणाची पातळी कमी करण्यासाठी शहरात पुरेशी हिरवळ नाही, असे कार्यकर्त्यांनी सांगितले आणि आक्रमक वृक्षारोपण व संरक्षण मोहीम राबवण्याची मागणी केली.

उलट, अधिकारी विमानतळाशी संबंधित रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली सध्याची झाडे तोडण्याची योजना आखत आहेत, असे परमदीप गेरेवाल म्हणाले, ज्यांनी एनआरआय पोलीस ठाण्याजवळील किल्ले गावठाण परिसरातील ५० झाडे वाचवण्यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे.

**पर्यावरणवाद्यांकडून तापमानवाढीचा इशारा**


पर्यावरणवाद्यांनी इशारा दिला आहे की, सध्या अस्तित्वात असलेला आणि बांधकाम सुरू असलेला, मोठ्या प्रमाणावरील काँक्रीटचा विकास तापमानवाढीत भर घालत आहे, तर प्रतिबंधात्मक उपायांच्या अभावामुळे नियोजित २१ व्या शतकातील शहराचे 'आजारी शहरात' रूपांतर होण्याचा धोका आहे.

# पनवेल मनपाचा आचारसंहिता आणि तक्रार निवारण कक्ष सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेची काटेकोर व पारदर्शक अंमलबजावणी व्हावी, यासाठी पनवेल महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तात्काळ निराकरण होणे तसेच निवडणूक प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी आचारसंहिता आचारसंहिता कक्ष व तक्रार निवारण कक्ष महापालिका मुख्यालयात सूरू करण्यात आला आहे. तसेच या कक्षाची माहिती महापालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांची आचारसंहिता पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना सहायक म्हणून उपायुक्त रवीकिरण घोडके नियुक्ती करण्यात आली आहे.



नागरिकांनी आदर्श आचारसंहितेबाबत कोणतीही तक्रार, सूचना किंवा माहिती द्यावयाची असल्यास ०२२-२७४५८०४०/८०४१/ ८०४२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा panvel corporationmcc@gmail.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

निवडणूक प्रक्रियेत शिस्त, नियमपालन व पारदर्शकता राखण्यासाठी पनवेल महानगरपालिका सतत दक्ष असून या कामी नागरिकांचा सहभाग व सहकार्य महत्त्वाचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# जप्त वाहनांचा आज पनवेलमध्ये ई-लिलाव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मोटार वाहन कर न भरलेल्या वाहनांवर मुंबई मोटार वाहन कर अधिनियमांतर्गत कारवाई करत प्रादेशिक परिवहन विभागाने एकूण ३३ वाहने अटकावून/जप्त केली आहेत. संबंधित वाहन मालकांना थकित कर भरण्याबाबत वारंवार कळविण्यात आले असतानाही कर न भरल्याने या वाहनांचा जाहीर ई-लिलाव २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे असे कराधान प्राधिकारी तथा सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल हरिभाऊ जेजुरकर यांनी कळविले आहे.

जप्त वाहनांमध्ये थ्री व्हीलर (प्रवासी), मोटार कॅब, मॅक्सी कॅब, मालवाहू वाहने, बस, एचजीव्ही डम्पर तसेच दुचाकी यांचा समावेश आहे. ही वाहने सध्या अण्णा पार्किंग, स्टील मार्केट, खिडकपाडा गाव, पनवेल येथे ठेवण्यात आली आहेत.

दरम्यान, ई-लिलावाच्या तारखेपर्यंत थकितदार वाहन मालकांना कर भरण्याची संधी देण्यात आली आहे. वाहन मालक/ताबेदार/वित्तदाते यांनी थकीत मोटार वाहन कर, पर्यावरण कर व शासकीय दंडाची रक्कम कार्यालयात भरून आपली वाहने सोडवून घ्यावीत. हरकत असल्यास २० जानेवारी २०२६ पर्यंत लेखी हरकत नोंदवावी. त्यानंतर कोणतीही हरकत नसल्याचे गृहीत धरून लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

ई-लिलाव होणाऱ्या वाहनांची सविस्तर यादी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असून, इच्छुकांनी ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी व्हावे. ई-लिलावाच्या अटी व शर्तींची माहिती कार्यालयीन वेळेत उपलब्ध असल्याचेही परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.

# मतदान यंत्रांची प्रथम स्तर तपासणी

## स्ट्राँग रूममध्ये आयुक्तांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक विषयक कामकाजाला वेग आला आहे. निवडणूकीसाठी आवश्यक मतदान यंत्राची प्रथम स्तर तपासणी वारकरी भवन येथील स्ट्राँग रुम येथे सुरु आहे. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी प्रथम स्तर तपासणीच्या ठिकाणी भेट देत तेथे सुरु असलेल्या कार्यप्रणालीची पाहणी केली.

या वेळी त्यांच्यासमवेत इव्हीएम मशीन विषयक कार्यवाहीचे नोडल अधिकारी उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड, वाहन व्यवस्थेचे नोडल अधिकारी तथा परिवहन व्यवस्थापक योगेश कडुस्कर, कार्यकारी अभियंता प्रविण गाडे उपस्थित होते.

२८ प्रभागांमध्ये १११ जागांसाठी निवडणूक होत असून ११४८ मतदान केंद्रे आहेत. या करिता आवश्यक असणारी मतदान यंत्रणा मा.राज्य निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करून देण्यात आली असून त्याची प्रथम स्तर तपासणी राजकीय पक्ष प्रतिनिधीच्या समक्ष करण्यात येत आहे.



या तपासणी प्रक्रियेची पाहणी करीत आयुक्तांनी बिनचूकपणे काम करण्याच्या सूचना दिल्या.

उद्या १ जानेवारीपासून निवडणूकीसाठी नेमलेल्या निवडणूक कर्मचाऱ्यांच्या पहिल्या प्रशिक्षणास विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे सुरुवात होत असून या प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करीत प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या व आदेशांचे पालन न करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्या विरोधात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल स्पष्ट करण्यात आलेले आहे.

# मतदान जनजागृतीसाठी पथनाट्याचा आधार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक पालिका इतिहासात प्रथमच बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीने होत आहे. त्यामुळे मतदारांनी कशा पद्धतीने मतदान करायचे याविषयी जनजागृती करण्यासाठी पथनाट्याचा आधार घेतला जात आहे. तर दुसरीकडे शहरात फलक, डिजिटल होर्डींग, रिल्स, चित्रफिती अशा सर्वच माध्यमांद्वारे प्रचार व प्रसार सुरू करण्यात आला आहे.




निवडणुकीसाठीच्या 'मतदार शिक्षण, जागृती आणि साक्षरता कार्यक्रम अर्थात स्वीप अंतर्गत मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. महानगरपालिका क्षेत्रात दररोज विविध भागांमध्ये वर्दळीच्या ठिकाणी सकाळच्या सत्रात पथनाट्याचे पाच प्रयोग व संध्याकाळच्या सत्रात पाच प्रयोग अशाप्रकारे दिवसामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी १० प्रयोग होत आहेत. त्यामधून नागरिकांना मतदानाचा हक्क बजावावा याकरिता हसत-खेळत आवाहन करण्यात येत आहे तसेच बहुसदस्यीय प्रभागांकरिता करावयाच्या मतदान पद्धतीची माहिती देण्यात येत आहेत.

आतपर्यंत बेलापूर विभागात रमाबाई नगर, बेलापूर स्टेशन पूर्व भाग, बेलापूर स्टेशन पश्चिम भाग, डी-मार्ट समोरील चौक तसेच संध्याकाळच्या सत्रात सीवूड्स स्थानक पश्चिम भाग, येवले चहा समोरील चौक, ज्वेल ऑफ नवी मुंबई, करावे तलाव परिसर आणि बेलापूर गाव मुख्य चौक या ठिकाणी निवडणूक विषयक जनजागृतीपर पथनाट्याचे प्रयोग करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २८ प्रभागांपैकी १ ते २७ प्रभागांमधील प्रत्येक मतदाराला अ,ब,क,ड अशा ४जागांसाठी ४ मते द्यावयाची आहेत. तसेच फक्त २८ व्या प्रभागात अ,ब,क अशा ३ जागांसाठी ३ मते द्यावयाची आहेत. या मतदानाची पद्धत या पथनाट्यातून सांगितली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पथनाट्याच्या माध्यमातून मतदानाचा टक्का वाढावा तसेच बहुसदस्यीय प्रभागात मतदान करण्याची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवावी याकरिता १३ जानेवारीपर्यंत ठिकठिकाणी नियोजनबद्ध रितीने पथनाट्ये आयोजित करण्यात आली आहेत.

> **संविधानाने आपल्याला दिलेला मतदाना अधिकार नीटपणे वापरता आला पाहिजे. आपले मत वाया जाऊ नये म्हणून पथनाट्यांचे आयोजन केले आहे. मतदारांनी आवर्जून पथनाट्ये पाहावीत व योग्य पद्धतीने मतदान करावे.**
> **-डॉ. अजय गडदे,** निवडणूक जनजागृती प्रचार व प्रसार प्रमुख, नवी मुंबई

# नववर्षानिमित्त गणेशभक्त चिरनेर महागणपतीच्या चरणी



**उरण : प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र चिरनेर येथे काल नववर्षाच्या पहिल्याच दिवशी गुरुवारी १ जानेवारी ३०२६ ला नववर्षाच्या निमित्ताने भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती.

उरण, पनवेल, पेण, नवी मुंबईसह मोठ्या संख्येने गणेशभक्त चिरनेर येथे येऊन, श्री महागणपतीचे मनोभावे दर्शन घेतले. सकाळ सकाळी पाऊस बरसला, तरीही गणेश भक्तांनी श्री महागणपतीचे दर्शन घेतलेच. या वेळी गणेशभक्तांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

विशेषता छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय, परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. हॉटेल, नारळ, हार, फुले व गावठी पालेभाज्या, वालाच्या, चवळीच्या शेंगा पापड, भाजीपाला व प्रसाद विक्रेते, पेढेवाले सुखावले होते. श्री महागणपती मंदिर परिसरात कंदमुळांसह रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करताना दिसून आल्या. भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थानतर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.



**उरण : फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्रा. किशोर पाटील यांना वाढदिवसानिमित्त फुंडे विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णा कडू, प्राचार्य बबन साळुंखे, कार्यालयीन प्रमुख नवनीत ठाकूर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा.बाबूलाल पाटोळे, कार्यालयीन सेवक सुरेश पाटील आदींनी शुभेच्छा दिल्या.**



**नवी मुंबई : महापालिकेच्या ३४व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच नववर्षाबद्दल आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या. महापालिका मुख्यालयात वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देणारी आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. त्यातून मतदानाचा प्रत्येकाने हक्क बजावावा, असा संदेश देण्यात आला आहे.**

# पळस्पे येथे पर्यावरणीय कायदेशीर साक्षरता कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुका विधी सेवा समिती पनवेल, वकील संघटना पनवेल आणि पंचायत समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आजचे रक्षण करा, उद्या सुरक्षित करा या विषयावर आधारित पर्यावरणीय कायदेशीर साक्षरता व समुदाय संरक्षण उपक्रम अंतर्गत जनजागृती कार्यक्रम पळस्पे येथे यशस्वीपणे झाला.

हा कार्यक्रम पळस्पे ग्रामपंचायत कार्यालयात झाला असून यावेळी जवळपास ११० नागरिकांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रदूषणग्रस्त भागांतील असुरक्षित समुदायांमध्ये पर्यावरणीय कायद्यांविषयी साक्षरता वाढवणे, उच्च प्रदूषण पातळीमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यधोक्यांबाबत जनजागृती करणे, प्रदूषणाच्या संपर्कासंदर्भातील गैरसमज दूर करणे तसेच पर्यावरणीय कायद्यांतर्गत उपलब्ध तक्रार निवारण यंत्रणांपर्यंत नागरिकांना पोहोचण्यास मदत करणे, या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच पर्यावरण रक्षणाच्या माध्यमातून सामाजिक व वैयक्तिक पातळीवर विजय कसा साधता येतो, याचे विविध पैलू उदाहरणांसह उपस्थितांसमोर मांडण्यात आले.



कार्यक्रमात पर्यावरण संरक्षणासाठी समुदाय-आधारित व स्वयंसेवी उपाययोजनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विशेषतः मुले, वृद्ध व्यक्ती, बाहेरील कामगार, शाळा, अंगणवाडी केंद्रे, बांधकाम स्थळे आणि सार्वजनिक ठिकाणी असे संरक्षणात्मक उपाय राबविल्यास पर्यावरण संरक्षणाच्या लढ्यात प्रभावी यश मिळू शकते, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी समीर वाठारकर हे उपस्थित होते. त्यांनी पर्यावरण संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून ती एक सामाजिक चळवळ असल्याचे सांगत शाश्वत भविष्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता अधोरेखित केली.

प्रमुख वक्त्या ॲड. दिपाली बोहरा यांनी पर्यावरणीय कायद्यांच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना प्रत्यक्ष जीवनात आपण कोणकोणत्या गोष्टींमध्ये बदल करून सकारात्मक पर्यावरणीय परिवर्तन घडवून आणू शकतो याबाबत अनेक समर्पक उदाहरणांच्या माध्यमातून सखोल मांडणी केली. दैनंदिन सवयींमधील छोटे बदलही पर्यावरण रक्षणासाठी मोठा सकारात्मक परिणाम घडवू शकतात, याची त्यांनी उपस्थितांना जाणीव करून दिली.

कार्यक्रमात पी.एल.व्ही. शैलेश कोंडसकर यांनी कार्यक्रमाच्या एकूण उद्दिष्टांच्या अनुषंगाने पर्यावरण रक्षण, कायदेशीर जागरूकता आणि सामाजिक सहभाग यांच्या माध्यमातून यश व विजय प्राप्त करण्याचे विविध पैलू स्पष्ट केले. कार्यक्रमास रिटेनर ड. सुयश कामेरकर, पॅनल ॲड. अंकुश कुळये तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामविकास अधिकारी सुदिन पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. उपस्थित नागरिकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरणीय कायदे व आरोग्य संरक्षणाबाबत माहिती घेतली.

# 'थर्टीफर्स्ट'ला माणगावात कडक नाकाबंदी

## मद्यपी व अवैध वाहनचालकांना शिस्तीचा दणका



**माणगाव : प्रतिनिधी**

नववर्षाच्या स्वागताच्या पूर्वसंध्येला माणगाव शहरात वाढत्या वाहतूक अराजकतेला आळा घालण्यासाठी माणगाव पोलीस व वाहतूक पोलीस विभागाने संयुक्तपणे कडक नाकाबंदी राबवली.

थर्टीफर्स्टच्या दिवशी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, महामार्ग, एसटी बस स्थानक, महाविद्यालय परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी अचानक उभारण्यात आलेल्या नाकाबंदीमुळे नियम तोडणाऱ्या वाहनचालकांची चांगलीच धांदल उडाली. वाहन चालकांची चांगलीच झाडाझडती घेत, नववर्षाच्या पूर्वसंख्येला म्हणजे थर्टी फर्स्ट दिवशी माणगावत नाकाबंदी केली.

या कारवाईत मद्य प्राशन करून वाहन चालवणाऱ्या वाहन चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या अनेक वाहनचालकांचे धाबे दणाणले. त्यामुळे अवैद्य वाहतूकदारांनी या कारवाईचा धसका घेतला आहे. यामुळे संयुक्त पोलिसांच्या कारवाईत वाहन चालकांना चांगलाच शिस्तीचा दणका मिळाला.

गेल्या काही दिवसांपासून माणगाव शहरात वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता. हेल्मेटविना दुचाकीस्वार, सीटबेल्ट न लावणारे चालक, अपूर्ण कागदपत्रे, प्रदूषण प्रमाणपत्र नसलेली वाहने, अवैध व तुटलेल्या नंबर प्लेट्स, काळ्या काचा असलेली वाहने, परवाना नसलेले चालक, ट्रिपल सीट दुचाकीस्वार, बुलेटच्या कर्कश सायलेंसरचा त्रास, सायरन लावलेली वाहने यामुळे अपघातांची शक्यता वाढत होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कठोर भूमिका घेत विशेष तपासणी मोहीम सुरू केली.

या नाकाबंदीदरम्यान सकाळी व सायंकाळी शेकडो दुचाकी व चारचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर थेट दंडात्मक कारवाई करण्यात आली असून अनेक वाहनधारकांवर कागदपत्रांच्या अभावामुळे दंड ठोठावण्यात आला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे बेकायदेशीर वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. ही मोहीम रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या आदेशाने तसेच माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे आणि महामार्ग वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक भुजबळ यांच्या नियोजनाखाली पोलीस व वाहतूक विभागाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीम. लाड, एएसआय पाटील तसेच कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई यशस्वी केली.

नागरिकांनी वाहनांचे सर्व कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर अनिवार्य करावा आणि कायद्याचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या कारवाईबाबत नागरिकांमध्ये मिश्र प्रतिक्रिया उमटत असल्या तरी बहुतांश नागरिकांनी पोलिसांच्या धडक कारवाईचे स्वागत करत, अशा मोहिमांमुळे शहरात नियमबद्ध वाहतूक आणि सुरक्षितता निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

या तपासणी मोहिमेत वाहतूक पोलीस शिवराज बांडे, शेरकर, यांनी सक्रिय सहभाग घेतला. कडक नाकाबंदीमुळे अवैध वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, माणगाव शहरात वाहतूक शिस्तीच्या दिशेने पोलिसांचे हे पाऊल निर्णायक ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# नागोठणे घरफोडीप्रकरणी सराईत आरोपी अटकेत

## पाच दिवसांची पोलीस कोठडी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस ठाण्यात दिनांक २ डिसेंबर २०२५ व दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी अनुक्रमे दोन घरफोडीचे गुन्हा क्रमांक १८७/२५ व १८८/२५ असे गुन्हे दाखल झाले होते.

याबाबत पोलीस अधीक्षक रायगड आंचल दलाल यांचे तत्काळ कारवाईचे आदेश प्राप्त होताच रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व नागोठणे पोलीस ठाणे यांनी संयुक्तिक रित्या तपास करून सदरील गुन्ह्यातील आरोपीस कौशल्यपूर्ण हाताळणी करून अटक करण्यात आली असून आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. या कामगिरीबाबत नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी व त्यांच्या सहकारी यांच्यावर कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

याबाबत नागोठणे पोलीस ठाण्याकडून प्राप्त झालेली माहितीनुसार रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व नागोठणे पोलीस ठाणे यांनी संयुक्तरीत्या सदर गुन्ह्यातील आरोपी यांचा तांत्रिक विश्लेषण व वैज्ञानिक धागेद्वारे यांच्या आधारे नमूद आरोपी नामे कुलदीप राधेश्याम डोडवे (वय २२, राहणार गेटा, पोस्ट तांडा, तालुका कुक्षी, राज्य मध्य प्रदेश) येथून सापळा रुचून कौशल्यपूर्ण हाताळणी अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस ठाणे करीत आहेत.

नागोठणे पोलीस ठाणे गु. र. नं. १८८/२०२५ बीएनएस कलम ३०५(अ), ३३१(३)(४) घरफोडी या गुन्ह्यात कुलदीप राधेशाम डोडवे (वय २२, रा. गेट्टा, ता. कुक्षी, जिल्हा धार, मध्य प्रदेश) यास बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली असून त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपूस करता त्याने सदर गुन्हा केल्याची तसेच नागोठणे पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १८७/२०२५ बी एन एस कलम ३०५(अ) वगैरे गुन्हा केला असल्याचीदेखील कबुली दिलेली आहे.

# म्हसळा पोलिसांचा पत्रकारांसोबत संवाद



**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या अध्यक्षते खाली ही पत्रकार सहविचार सभा उत्साह–पूर्ण वातावरणात पार पडली.

या बैठकीसाठी म्हसळा तालुका पत्रकार संघातील पत्रकारांसह राज्य व जिल्हास्तरावर कार्यरत पत्रकारांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते. त्यामुळे पोलीस आणि पत्रकारांमधील संवाद अधिक प्रभावी आणि पारदर्शक ठरला. सभेदरम्यान कायदा व सुव्यवस्था, वाहतूक कोंडी, सामाजिक सुरक्षितता, महिला व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह नागरिकांच्या दैनंदिन समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. बहुतांश नागरी समस्यांमध्ये नगरपंचायतीचा प्रत्यक्ष सहभाग आसल्याचे उपस्थितांकडून मत आले.

रविंद्र पारखे बोलताना या वेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी पत्रकारांच्या सूचनांना सकारात्मक प्रतिसाद देत, समाजहितासाठी पोलीस–पत्रकार चांच्यातील समन्वय अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

सभेच्या शेवटी ज्येष्ठ पत्रकार संजय खांबेटे यांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानत पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी आणि प्रशासनाशी समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. ही सहविचार सभा पोलिस व पत्रकार यांच्यातील विश्वास वृद्धिंगत करणारी ठरली असून, म्हसळा शहराच्या विकासाच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल मानली जात आहे.



**अलिबाग : सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाच्या स्वागताचा शहरासह ग्रामीण भागात जल्लोष करण्यात आला.** (छाया : जितू शिगवण)

# शिवसैनिकांकडून काळोखे हत्येचा निषेध

**महाड : प्रतिनिधी**

खोपोली येथील शिवसेना शिंदे गटाच्या नवनिर्वाचित विद्यमान नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या झालेल्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ बुधवारी (दि.३१) महाडमध्ये शिवसैनिकांनी तीव्र निषेध आंदोलन केले.

महाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत शिवसैनिकांनी जोरदार निदर्शने केली. घोषणाबाजी देत महाड शहर पोलिसांना एक निवेदन सादर केले.

या आंदोलनावेळी गुंडगिरीला पाठबळ दिले जात असल्यामुळेच खोपोली येथील हत्याकांड घडल्याचा दावा शिवसैनिकांनी केला आहे.



# नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बिबट्याविषयक जनजागृती

## चारशे विद्यार्थांसह शिक्षकांची उपस्थिती

**नागोठणे : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य शासनाच्या नागोठण्यातील मुंबई–गोवा महामार्ग लगत असलेल्या राज्य शासनाच्या आद्य क्रांतिकारी वासुदेव बळवंत फडके औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे या संस्थेच्या मागील बाजूस असलेल्या झाडी झुडपातील परिसरात बिबट्या आल्याची माहिती चुकीची व बिनबुडाची ठरलेली घटना ताजी आहे.

या पार्श्वभूमीवर वन खात्याच्या नागोठणे वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयामार्फत नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बुधवार, ३१ डिसेंबर रोजी बिबट्या विषयक जनजागृती कार्यक्रम रोहा येथील सागर दहिंबेकर यांच्या रेस्क्यू टीमकडून संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी घेण्यात आला.

वन खात्याच्या नागोठणे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनपरिक्षेत्र अधिकारी दादासाहेब कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दुपारी तासभर घेण्यात आलेल्या या बिबट्या विषयक जनजागृती कार्यक्रमात रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट तसेच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांच्या वतीने रेस्क्यू टीमचे सागर दहिंबेकर यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षक यांना बिबट्या विषयक महत्त्वपूर्ण माहिती देऊन बिबट्या हा आपला काही दुश्मन नाही किंवा बिबट्याचे आपण दुश्मन नाही.

बिबट्या हा उगीचच कोणावर हल्ला करीत नाही अशा प्रकारची विविध बहुपयोगी माहिती एल सी डी स्क्रीनवर देऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. या वेळी वन खात्याच्या नागोठणे बीटचे वनरक्षक मधुकर सोनावणे, वासगाव बीटचे वनरक्षक अर्जुन जारवाल यांच्यासह नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी, गटनिदेशक व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

काही दिवसांपूर्वी नागोठणे आयटीआय कॉलेज परिसरात बिबट्या सदृश्य प्राणी दिसून आल्याची माहिती समोर आल्याने नागोठणे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर वनविभाग, रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट तसेच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांच्या संयुक्त पथकाने घटनास्थळी जाऊन सखोल तपासणी केली.

तपासणीदरम्यान त्या ठिकाणी बिबट्याशी संबंधित कोणतीही हालचाल अथवा पायांचे ठसे आढळून आले नाहीत. संस्थेच्या सुमारे ४०० विद्यार्थ्यांना तसेच प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना बिबट्याबाबत आवश्यक माहिती, खबरदारी व सुरक्षितते संदर्भात हा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.


# शिपुरकर आणि शिंदे शाळेचे अबॅकस परीक्षेत नेत्रदीपक यश

**माणगाव : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला नवी दिशा देणाऱ्या अबॅकस व वैदिक गणिताच्या क्षेत्रात माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर शिपुरकर आणि शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी पुन्हा एकदा आपले गुणवत्तेचे नाणे खणखणीत वाजवले आहे.

यंग मास्टर आयोजित १५ वी राष्ट्रीय यंग अबॅकस टॅलेंट सर्च २०२५ या प्रतिष्ठित स्पर्धेत शिपुरकर शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून शाळेचा, शिक्षकांचा व पालकांचा अभिमान वाढवला आहे.

ही स्पर्धा २१ डिसेंबर २०२५ रोजी चंद्रेश लोढा मेमोरियल स्कूल, डोंबिवली (मुंबई) येथे उत्साहात पार पडली. या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सुमारे ४०० विद्यार्थी सहभागी झाले होते. रायगड जिल्ह्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी पल्लवी अबॅकस क्लासेस अंतर्गत सहभाग घेतला होता. या चुरशीच्या स्पर्धेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिपुरकर आणि शिंदे शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपली बुद्धिमत्ता, एकाग्रता व वेगवान गणनाशक्ती सिद्ध केली.



या स्पर्धेत यशस्वी ठरलेले विद्यार्थी रितेश चंद्रशेखर तांबट (इयत्ता १ ली) – ड्रॉ अँड काउंट प्रकारात प्रथम क्रमांक, शिंदे शाळा, गार्गी महेश मोरे (इयत्ता २ री) – फास्ट राइटिंग मध्ये प्रथम क्रमांक, शिपुरकर शाळा, स्वराली जगदीश पवार – ड्रॉ अँड काउंट मध्ये प्रथम क्रमांक, शिपुरकर शाळा, मिहीका संतोष शिंदे – फास्ट सम्स मध्ये द्वितीय क्रमांक, शिपुरकर शाळा, प्रभास सूरज घेवारे – तृतीय क्रमांक शिपुरकर शाळा, प्रार्थना सुशांत लाड – वैदिक गणित विषयात तृतीय क्रमांक, शिंदे शाळा या लहानग्या विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वातून केवळ बक्षिसेच नव्हे, तर आत्मविश्वास, शिस्त व सातत्यपूर्ण मेहनतीचे महत्त्वही अधोरेखित केले आहे.

अबॅकस व वैदिक गणितामुळे विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, एकाग्रता व गणिती कौशल्ये विकसित होत असल्याचे हे यश उत्तम उदाहरण आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, पल्लवी अबॅकस क्लासेसचे प्रशिक्षक तसेच पालकवर्गाने विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. भविष्यातही अशीच उज्वल कामगिरी करून शाळेचे नाव राष्ट्रीय पातळीवर उंचावावे, अशा शुभेच्छा सर्व स्तरातून व्यक्त होत आहेत.

# रोह्यातील शवदाहिनीचे दर कमी करणार –नगराध्यक्ष वनश्री शेडगे

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरात शव दहनीचे दर कमी करणार असल्याचे नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी रोहा नगर परिषद येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. ते दर सरसकट रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील नागरिकांसाठी ५०० रुपये करण्यात आले आहे.

या वेळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, मयुर दिवेकर, अहमद दर्जी, अजित मोरे, गौरी बारटक्के, प्रियंका धनावडे उपस्थित होते.

या वेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी पत्रकार परिषदेत भविष्यात रोहा शहराचा विकास आढावा घेत असताना अनेक मुद्दे मांडले यामध्ये प्रामुख्याने शाळेतील विकासासाठी रोहा नगर परिषदेचे इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्याचा मानस आहे.



रोहा शहरात स्वच्छता बाबत जनजागृती करण्यात येणार आहे. याबाबत स्वच्छतासाठी आवश्यक वाहने आणण्याचे प्रयत्न आहे. ठिक ठिकाणी गटातून बाहेर काढलेला कचरा लवकर उचलण्यात येईल.

ना.अदिती तटकरे यांच्या माध्यमातून नगर परिषद शाळा डिजिटल करण्यात आल्याने नगर परिषद शाळेला त्याचा फायदा झाल्याने तीन शाळांना पारीतोषीक मिळाल्याचे सांगितले. अपंग निधी १२७ लोकांना वाटप करण्यात येणार आहे. शहरातील पार्किंग व्यवस्था सुरळीत करणार आहोत. वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने याबाबत माहिती घेत चर्चा करुन निर्णय घेणार आहोत. शहरातील रस्ते, बायपासला रोहा शहरात मुख्य रस्ते जोडणे, कचरा डेपो आदी प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

वनखात्यांने जंगलात अन्य झाडे न लावता फळ झाडे लावल्यास शहरात येणाऱ्या माकडांवर मर्यादा येतील. शहरातील भुयारी गटाराचे चांगली एजन्सी काम करीत असून सध्या १७ किमी पैकी तीन ते साडेतीन किमीचे काम झाले आहे. पावसाळ्याआधी काम पुर्ण होणार असल्याचे शेडगे यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत कर्मचारी यशवंत कदमांना सेवानिरोप

**चौक : प्रतिनिधी**

ग्रामपंचायत वावंढळ कर्मचारी यशवंत धोंडजीराव कदम सेवा निवृत्त झाले. त्यांचा ग्राम पंचायत यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यशवंत धोंडजीराव कदम हे ग्राम पंचायत वावंढळ येथे शिपाई म्हणून नियुक्त होते, त्यांची एकूण सेवा २४ वर्ष पूर्ण झाली. शासकीय नियत नियमानुसार ते सेवा निवृत्त झाले. सरपंच सुहास कदम यांनी सत्कार केला.

या वेळी रामदास काईनकर, पत्रकार अर्जुन कदम, यशवंत मुळे, ग्राम पंचायत अधिकारी मंगला केदारे, माजी उपसरपंच ललिता काइनकर, अमोल कदम, यशवंत धोंडजीराव कदम यांच्या पत्नी योगिता कदम, परिवार कल्पना कदम, श्रीपत कदम, आत्माराम कदम, सुहासिनी कदम यांच्यासह ग्रामस्थ, कर्मचारी, सदस्य उपस्थित होते.



# नागोठण्यातील जोगेश्वरी मातेच्या मूळस्थानी विद्युतीकरण

## किशोर जैन यांच्या हस्ते उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे गावाचे आराध्यदैवत ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या मुळ स्थानावर पूर्वेकडील डोंगर (घरळी) येथे रविवारी (दि.२८) सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी असंख्य भाविकांनी श्री जोगेश्वरी मातेचे दर्शन घेऊन सत्यनारायणाची पुजा करून तिर्थ प्रसादाचा लाभ घेतला.



सत्यनारायणाच्या महापुजेचे औचित्य साधून श्री जोगेश्वरी मातेच्या मुळ स्थानी घरळी परिसरातील विद्युतीकरण कामाचे नागोठणे ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक माजी रजिप सदस्य किशोर जैन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. घरळी परिसरातील रोशनाई बघून भाविक अतिशय खुश झाले असून किशोरभाई जैन व माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक तसेच नागोठणे ग्रामपंचायत यांना धन्यवाद देत आहेत.

घरळी परिसरात दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना रात्रीच्या वेळी त्रास होवू नये म्हणून माजी रजिप सदस्य किशोर जैन यांनी अथक प्रयत्न करून जिल्हा परिषदेच्या डीपीडीसी फंडातून घरळी परिसरातील विद्युतीकरणकामासाठी १० लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला त्यावेळी तत्कालीन सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांचे त्यांना मोलाचे सहकार्य लाभले. घरळी परिसरात एक किलोमीटरच्या अंतरावर एमएसईबी चे १९ पोल बसवून वायर टाकून विद्युतीकरण करण्यात आले असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे यांनी दिली. घरळी परिसरातील विद्युतीकरण कामाच्या उदघाटना प्रसंगी माजी रजिप सदस्य किशोर जैन, माजी सरपंच विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच अकलाख पानसरे, ग्रामपंचायत सदस्य, सचिन ठोंबरे, ॲड. प्रकाश कांबळे, संतोष नागोठणेकर, भरत गिजे, अनिल महाडिक, भाविका गिजे, विठ्ठल खंडागळे, सुनिल राऊत, नितीन राऊत, संतोष जोशी, सुधाकर शिर्के, पिंटू रटाटे, हरेश शिर्के आदिंसह ज्वाला ग्रुप ग्रामस्थ मंडळ खडकआळी नागोठणे उपस्थित होते.

# टी-२० वर्ल्डकपसाठी टीम ऑस्ट्रेलिया जाहीर

## फिरकीपटूंचा संघात भरणा



**सिडनी : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाने आपला १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. आशियाई मैदानातील परिस्थितीचा विचार करता निवड समितीने फिरकीपटूंवर अधिक विश्वास दाखवल्याचे दिसते.

मिचेल मार्शच्या नेतृत्वाखालील संघातून हॉबर्ट हरिकेन्सचा ऑलराऊंडर मिचेल ओवेन याला वगळण्यात आले असून हा निर्णय सर्वाधिक धक्कादायक मानला जात आहे. ओवेनने मागील सहा महिन्यांत १३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले होते, मात्र कॅमेरून ग्रीन आणि अनुभवी मार्कस स्टॉयनिस यांच्या पुनरागमनामुळे त्याला वर्ल्डकपसाठीच्या ऑस्ट्रेलियन संघात स्थान मिळालेले नाही.

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाने जो संघ निवडला आहे, त्यात एकही डावखुरा वेगवान गोलंदाजाचा समावेश नाही. मिचेल स्टार्कने आधीच टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. स्पेन्सर जॉन्सन पाठीच्या दुखापतीचा सामना करत आहे. जलदगती गोलंदाजामध्ये झेवियर बार्टलेट याला संधी देण्यात आली आहे.

कूपर कोनोली याची संघात पुन्हा निवड होणे आश्चर्यकारक ठरले आहे. मागील १२ टी-२० सामन्यात तो संघाबाहेर होता, मात्र उपयुक्त फिरकी गोलंदाज म्हणून त्याला संधी देण्यात आली आहे. याशिवाय मॅथ्यू शॉर्ट, मॅथ्यू कुह्नेमन आणि झेवियर बार्टलेट यांना टी-२० वर्ल्डकपमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळू शकते.

आयसीसीच्या नियमानुसार ३१ जानेवारीपर्यंत संघात बदल करता येऊ शकतो. त्यामुळे आयत्या वेळी मिचेल ओवेनसह बेन ड्वारशुइस, सीन ॲबॉट, ॲरॉन हार्डी, ॲलेक्स केरी आणि जोश फिलिप यांच्यासाठी अजूनही संघाचे दरवाजे उघडण्याची एक संधी निश्चितच आहे.

**संघ** : मिचेल मार्श (कर्णधार), झेवियर बार्टलेट, कूपर कोनोली,पॅट कमिन्स, टिम डेविड, कॅमरून ग्रीन, नॅथन एलिस, जोश हेजलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस (यष्टीरक्षक), मॅथ्यू कुह्नेमन, ग्लेन मॅक्सवेल, मॅथ्यू शॉर्ट, मार्कस स्टोइनिस आणि ॲडम झम्पा.

### तीन अनफिट खेळाडूंचा समावेश

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियन संघाने दुखापतीतून अजूनही सावरत असलेल्या तिघांना संघात स्थान दिले आहे. कर्णधार पॅट कमिन्स यांच्या पाठीचे स्कॅन लवकरच होणार आहे. वेगवान गोलंदाज जोश हेजलवूड आणि फलंदाज टिम डेविड दोघेही स्नायू दुखापतीतून पूर्णतः सावरलेले नाहीत, पण ते टी-२० वर्ल्डकप स्पर्धेपर्यंत फिट होतील या आशेवर ऑस्ट्रेलियन संघाने त्यांना संघात स्थान दिले आहे.

स्व. उमेश शेणॉय चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# श्री स्वामी समर्थ, सिद्धार्थ मंडळ उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ, सिद्धार्थ मंडळ यांनी अमरहिंद मंडळ आयोजित स्व. उमेश शेणॉय चषक राज्यस्तरीय कुमार कबड्डी स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरी गाठली.



दादर (प.) येथील अमर हिंद मंडळाच्या मैदानावर सुरू असलेल्या कुमारांच्या उपउपांत्यपूर्व फेरीत ठाण्याच्या श्री स्वामी समर्थ मंडळाने अटीतटीच्या लढतीत पालघरच्या इच्छाशक्ती मंडळाला ४०-३८ असे चकवत आगेकूच केली. पूर्वार्धात पहिला लोण देत स्वामी समर्थने २२-१३ अशी आश्वासक आघाडी घेतली. त्यामुळे उत्तरार्धात आहे, ती आघाडी टिकविण्यावर भर देण्याचा प्रयत्न करणाऱ्या सिद्धार्थ मंडळावर हा डाव उलटणार होता. उत्तरार्धात इच्छाशक्तीने टॉप गिअर टाकत सिद्धार्थ मंडळावर दोन लोण देत सामन्याची उत्कंठा शिगेला नेली, पण त्यांना सामना आपल्या बाजूने झुकवता आला नाही. अखेर सिद्धार्थ मंडळाने दोन गुणांनी बाजी मारत सुटकेचा निःश्वास सोडला. विवेक शिंदे, दवान चव्हाण यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. इच्छाशक्तीकडून अनुप मिश्रा, प्रेम जाधव यांनी शेवटच्या क्षणापर्यंत कडवी लढत देत कबड्डीरसिकांना सामन्यात खिळवून ठेवले.

दुसऱ्या उपउपांत्यपूर्व सामन्यात उपनगरच्या सिद्धार्थ मंडळाने मुंबईच्या जय भारत या बलाढ्य संघाला ४४-३५ असे नमवत आपली घोडदौड कायम राखली. विश्रांतीला १९-१३ अशी आघाडी घेणाऱ्या सिद्धार्थने विश्रांतीनंतर देखील आपले वर्चस्व कायम राखत नऊ गुणांनी विजय मिळविला. नरेश चौहान, संकेत यादव यांच्या नेत्रदीपक चढायांना अमित ब्रीद, करण मरानो यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे त्यांनी ही किमया साधली.

आर्यन बावडेकर, अथर्व कदम, श्रेयस मटकर यांनी जय भारतचा पराभव टाळण्याचा निकराचा प्रयत्न केला, पण त्यात ते अपयशी ठरले.

# एमटीपीएलमध्ये वाघोबा संघ विजेता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुका प्रीमिअर लीग (एमटीपीएल)मध्ये वाघोबा मुरूड संघाने विजेतेपद पटकाविले. स्पर्धेत एकूण २४ संघांचा सहभाग होता.

व्दितीय क्रमांक गुरू इलेव्हन चेहेर, तर तृतीय क्रमांक युवी स्पोर्ट्स सुरई संघाने प्राप्त केला. स्पर्धेत मालिकावीराचा किताब राज पाटील (सुरई), उत्कृष्ट फलंदाज संघाचा जयेश घाग (चेहेर), उत्कृष्ट गोलदांज हिमांशू मिसाळ (सुरई) यांची निवड करण्यात आली.



विजेत्या संघांना रोख रक्कम व चषक, तर वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना तसेच वाघोबा टीमचे संघ मालक प्रताप वरसोलकर यांना शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख प्रशांत मिसाळ, माजी जि.प.सदस्य राजश्री मिसाळ, किशोर काजारे, जावेद गोरमे आदींच्या हस्ते आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# खारेपाट लीग क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

आद्य नाईक प्रतिष्ठान खारेपाट लीग क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ हशिवरे येथील बालवीर मैदानावर झाला. या पाच दिवसीय स्पर्धेत खारेपाट विभागातील संघ सहभागी झाले आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस अलिबाग मुरूड विधानसभा अध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य अमित नाईक यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादीचे पदाधिकारी परशुराम म्हात्रे, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष



वैभव पाटील, सरपंच मच्छिंद्र पाटील, चिंचवली उपसरपंच अल्पेश पाटील, माजी सरपंच विद्याधर ठाकूर यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, सदस्य, सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, खेळाडू उपस्थित होते. नुकतेच धरमतर ते गेटवे ऑफ इंडिया हा ३६ किमी सागरी मार्ग पार करणाऱ्या सारा अभिजित वर्तक हिचा या वेळी नाईक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# टी-२० वर्ल्डकपसाठी अफगाणिस्तानची धुरा राशिद खानकडे; प्रमुख खेळाडूंचे पुनरागमन

**काबूल : वृत्तसंस्था**

आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने आपल्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. स्टार फिरकीपटू राशिद खानच्या नेतृत्वाखालील या संघात चार प्रमुख खेळाडूंचे पुनरागमन झाले असून यामुळे अफगाणिस्तानची बाजू अधिक भक्कम झाली आहे.



निवड समितीने वेगवान गोलंदाज फजलहक फारुकी, ऑफस्पिनर मुजीब उर रहमान, अष्टपैलू गुलबदीन नायब आणि उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज नवीन-उल-हक यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. ऑक्टोबरमध्ये झालेल्या बांगलादेश दौऱ्यासाठी फारुकी आणि नायब यांना संघात स्थान मिळाले नव्हते, मात्र विश्वचषकाचे महत्त्व लक्षात घेता त्यांचा पुन्हा समावेश करण्यात आला आहे.

मुजीब उर रहमानच्या पुनरागमनामुळे युवा मिस्ट्री स्पिनर ए.एम. गजनफरला मुख्य संघात स्थान मिळवता आले नाही. त्याचा समावेश राखीव खेळाडूंमध्ये करण्यात आला असून गजनफरसह एजाज अहमदजई आणि जिया उर रहमान शरीफी हेही राखीव खेळाडू म्हणून संघासोबत असतील.

विश्वचषकापूर्वी सराव आणि तयारीचा भाग म्हणून अफगाणिस्तानचा हा संघ संयुक्त अरब अमिरातीमध्ये (यूएई) वेस्ट इंडिजविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. ही मालिका १९ ते २२ जानेवारीदरम्यान रंगणार आहे.

२०२४च्या टी-२० विश्वचषकात अफगाणिस्तानने ऐतिहासिक कामगिरी करत उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली होती. त्या वेळी त्यांनी न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघांना धूळ चारली होती.

**संघ** : राशिद खान (कर्णधार), इब्राहिम जादरान (उपकर्णधार), रहमानुल्लाह गुरबाज व मोहम्मद इशाक (यष्टिरक्षक), सेदिकुल्लाह अटल, दरविश रसूली, शाहिदुल्लाह कमाल, अजमतुल्लाह उमरजई, गुलबदीन नायब, मोहम्मद नबी, नूर अहमद, मुजीब उर रहमान, नवीन-उल-हक, फजलहक फारुकी आणि अब्दुल्ला अहमदजई.

# जसप्रीत बुमराहने घडवला इतिहास!

## सलग दोन वर्ष कसोटी रँकिंगमध्ये अव्वल स्थानी कायम

**नवी दिल्ली** : भारतीय संघातील वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने २०२५ वर्षाच्या शेवटी एकही सामना न खेळता मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. आयसीसी कसोटी रँकिंगमध्ये त्याने नंबर १ स्थान मिळवले आणि ते शेवटपर्यंत कायमही ठेवले. यासह त्याने आयसीसीच्या रँकिंगमध्ये मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या कसोटी रँकिंगनुसार जसप्रीत बुमराह या यादीत अव्वल स्थानी कायम आहे. यासह तो कसोटी रँकिंगमध्ये दोन वर्ष नंबर १ स्थानी राहिलेला पहिलाच भारतीय वेगवान गोलंदाज ठरला आहे. याआधी २०२४ वर्षाच्या शेवटीदेखील तो नंबर १ स्थानी होता. असा पराक्रम याआधी कुठल्याही भारतीय वेगवान गोलंदाजाला करता आलेला नाही.

याआधी भारतीय संघातील माजी फिरकी गोलंदाज आर. अश्विनने हा कारनामा केला होता. अश्विन २०१५ आणि २०१६मध्ये सलग दोन वर्षे नंबर स्थानी कायम होता. इतकेच नव्हे तर २०२३मध्येही तो कसोटी गोलंदाजांच्या रँकिंगमध्ये अव्वल स्थानी होता, पण मुख्य बाब म्हणजे, अश्विन फिरकी गोलंदाज होता.

# मॅग्नस कार्लसनचे विक्रमी नववे जेतेपद

## भारताच्या अर्जुनला 'कांस्य'

**दोहा कतार : वृत्तसंस्था**

जागतिक बुद्धिबळ क्षेत्रातील महान खेळाडू मॅग्नस कार्लसनने आपल्या अनुभवाच्या जोरावर पुन्हा एकदा जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. हे त्याचे या प्रकारातील विक्रमी नववे जेतेपद ठरले. अंतिम फेरीत त्याने उझबेकिस्तानच्या तरुण ग्रँडमास्टर नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हचा २.५-१.५ अशा फरकाने पराभव केला.

गेल्या आठवड्यात 'रॅपिड' प्रकारात सुवर्णपदक जिंकणाऱ्या या दिग्गज ग्रँडमास्टरने आता 'ब्लिट्झ'मध्येही सुवर्ण कमाई करत आपले दुहेरी वर्चस्व प्रस्थापित केले आहे. अंतिम लढतीच्या चौथ्या डावात १.५-१.५ अशी बरोबरी असताना, कार्लसनने प्याद्याची विलक्षण खेळी करून अब्दुसत्तोरोव्हला चकित करत विजय निश्चित केला.




भारताच्या २२ वर्षीय अर्जुन एरिगेसीने या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. १९ फेऱ्यांच्या स्विस पात्रता फेरीत त्याने १५ गुणांसह अव्वल स्थान पटकावले होते, मात्र त्याला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. जागतिक ब्लिट्झ स्पर्धेत पदक जिंकणारा तो विश्वनाथन आनंदनंतरचा दुसरा भारतीय ठरला.

### महिला गटात बिबिसारा जगज्जेती

*महिलांच्या ब्लिट्झ स्पर्धेत कझाकिस्तानच्या बिबिसारा असाउबायेवाने युक्रेनच्या अण्णा मुझिचुकचा २.५-१.५ असा पराभव करत तिसऱ्यांदा जागतिक विजेतेपद मिळवले. या विजयासह तिने २०२६च्या प्रतिष्ठेच्या 'कँडिडेटस्' स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. २०२१ आणि २०२२नंतरचे तिचे हे तिसरे जागतिक ब्लिट्झ जेतेपद आहे.*

# गोव्यात हातात बिअरची बाटली घेऊन दिसली सारा तेंडुलकर

## फोटो व्हायरल



**पणजी : वृत्तसंस्था**

भारताचा माजी क्रिकेटपटू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याची कन्या सारा तेंडुलकर ही विविध कारणांमुळे नेहमीच चर्चेत असते, मात्र आता एका व्हायरल होत असलेल्या एका फोटोमुळे सारा हिच्यावर टीका होत आहे. सारा तेंडुलकर ही हातात बिअरची बाटली घेऊन गोव्यामध्ये रस्त्यावरून फिरत असल्याचा फोटो व्हायरल झाला आहे.

सारा तेंडुलकर ही मित्रमैत्रिणींसह नववर्ष साजरे करण्यासाठी गोव्याला गेलेली आहे. तिथे रस्त्यावरून फिरत असताना सारा हिचा फोटो कुणीतरी टिपला. या फोटोमध्ये तिच्या हातात बिअरची बाटली दिसत आहे. दरम्यान, हा फोटो व्हायरल झाल्यापासून लोक त्यावर विविध प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

सारा तेंडुलकर ही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात ॲक्टिव्ह असते तसेच तिच्या विविध पोस्टना चाहत्यांकडूनही भरभरून प्रतिसाद मिळत असतो. लोक तिच्या शांत आणि नम्र स्वभावाचे कौतुक करत असतात, मात्र व्हायरल झालेल्या या फोटोमुळे तिला टीका सहन करावी लागत आहे.

# बांगलादेशी खेळाडूंसाठी आयपीएलचे दरवाजे बंद होणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या मेगा ऑक्शनपूर्वी आणि आगामी हंगामासाठी सर्वच संघांनी आपली कंबर कसली आहे, मात्र कोलकाता नाईट रायडर्स आणि बांगलादेशचा स्टार वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमान यांच्यासाठी एक चिंतेची बातमी समोर येत आहे. भारत-बांगलादेशमधील तणाव पाहता बीसीसीआय या खेळाडूला खेळविणार की नाही यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

कोलकाताने मिनी ऑक्शनमध्ये ९.२ कोटी रुपये मोजून मुस्तफिजुरला आपल्या संघात घेतले आहे. यामुळे कोलकाता संघाला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागले आहे.



बीसीसीआयवरदेखील टीका झाली आहे. यामुळे बीसीसीआयने थांबा आणि पहाची भूमिका घेतली असून केंद्र सरकारने निर्देश दिले तरच बांगलादेशी खेळाडूंना आयपीएलमध्ये खेळविले जाणार नाही, असे म्हटले आहे.

दुसरीकडे २०२६मध्ये बांगलादेशचे महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय दौरे आणि मालिका नियोजित आहेत. अशा परिस्थितीत त्यांचे बोर्ड आपल्या मुख्य वेगवान गोलंदाजाला दुखापतीपासून वाचवण्यासाठी आयपीएलपासून दूर ठेवू शकते किंवा मर्यादित काळासाठीच परवानगी देऊ शकते.

मुस्तफिजुर रहमानने गेल्या काही हंगामात शानदार कामगिरी केली आहे. केकेआरसारख्या संघांना त्यांच्या डेथ ओव्हर्ससाठी मुस्तफिजुरसारख्या चतुर गोलंदाजाची गरज आहे, मात्र जर बांगलादेश बोर्डाने त्याला पूर्ण हंगामासाठी परवानगी दिली नाही, तर केकेआर किंवा इतर कोणताही संघ त्याच्यावर बोली लावण्यापूर्वी दोनदा विचार करेल.

# डब्ल्यूपीएलमधून तीन खेळाडूंची माघार

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग स्पर्धेला येत्या ९ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेआधी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स आणि यूपी वॉरियर्स संघाला तीन मोठे धक्के बसले आहेत. आरसीबीची स्टार खेळाडू एलिस पेरी, दिल्ली कॅपिटल्स संघाची खेळाडू एनाबेल सदरलँड तर यूपी वॉरियर्स संघाची खेळाडू तारा नॉरिसने आगामी हंगामापूर्वी माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.

एलिस पेरी आणि एनाबेल सदरलँडने वैयक्तिक कारणास्तव माघार घेतली असल्याची माहिती समोर येत आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पेरीची जागा भरून काढण्यासाठी सायली सातघरेला ३० लाखांच्या मूळ किमतीत संघात स्थान दिले आहे, तर सदरलँडच्या जागी अलाना किंगची निवड करण्यात आली आहे. तिला ६० लाख रुपये मोजून




संघात स्थान दिले गेले आहे.

यूपी वॉरियर्समधून संघाबाहेर झालेल्या तारा नॉरिसच्या जागी ऑस्ट्रेलियाची अष्टपैलू खेळाडू चार्ली नॉटला संघात स्थान दिले आहे. नॉरिसची नेपाळमध्ये होणाऱ्या महिला टी-२० वर्ल्डकप पात्रता फेरीतील सामन्यांसाठी अमेरिकेच्या संघात निवड झाली आहे. तिचादेखील ३० लाखांच्या मूळ किमतीत संघात समावेश करण्यात आला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com